रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८७ I अंक ३०५ I पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## गुढी उभारताना शॉक लागून तरुणाचा मृत्यू



**रसायनी :** मराठी नववर्षाची गुढी उभी करताना शॉक लागून रवींद्र जगन्नाथ राणे या ४२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. चौक मोरबे धरणग्रस्त पुनर्वसन वसाहत असलेल्या मोरबे या गावात रवींद्र जगन्नाथ राणे हे आपल्या घरासमोर अंगणात गुढी उभी करत होते, त्यांच्या घरावरून उच्चदाबाचा वीज प्रवाह असलेली वीजवाहिनी गेली आहे. गेली कित्येक वर्षे रवींद्र राणे व इतर बाधित ग्रामस्थ ही वीजवाहिनी काढून टाकण्यासाठी विद्युत पान २ वर




सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील...
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील...
महाराष्ट्राच्या रणरागिणी, माजी राज्यमंत्री
स्व. मीनाक्षीताई पाटील
यांस भावपूर्ण श्रद्धांजली
शोकाकुल : ग्रुप ग्रामपंचायत किहीम






# आमदारांकडून आचारसंहितेचा भंग

- महायुतीतील मित्रपक्षांकडून मतदारांना प्रलोभने
- वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत भूमीपूजन
- जिल्हाधिकाऱ्यांच्या कारवाईकडे लक्ष

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून, वातावरण सध्या तापले आहे. येत्या ७ मे रोजी रायगडमध्ये मतदान पार पडणार आहे. त्यामुळे महायुतीतील मित्रपक्षांकडून मतदारांना प्रलोभने दाखविण्यास सुरुवात झाली आहे. अलिबाग तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत दोन विकासकामांचे भूमीपूजन शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर संपूर्ण देशात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या कालावधीत लोकप्रतिनिधींनी विकासकामांचे भूमीपूजन केल्यास आचारसंहितेचा भंग होतो. असे असतानाही आमदारांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना भूमीपूजन केले. त्यामुळे सत्ताधारी आमदारांवर जिल्हाधिकारी कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. पान २ वर



### नियमांना केराची टोपली

सत्ताधारी पक्षाला निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर कुठल्याही प्रकारे सरकारी घोषणा, नवीन योजना सुरू करता येत नाही. याशिवाय शिलान्यास, उद्‌घाटन, लोकार्पण, भूमीपूजन असे कार्यक्रमही घेता येत नाहीत. असे असताना शिंदे गटाचे आ. दळवी यांनी आचारसंहितेच्या नियमांना केराची टोपली दाखवत बिनधास्तपणे विकासकामांचे भूमीपूजन केले. नियम सर्वांना सारखेच असले पाहिजेत. मात्र, तरीदेखील आमदाराकडून निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केले जात आहे. यावर आयोग कारवाई करेल का, असा प्रश्न जनतेने उपस्थित केला आहे.

> निवडणुकीच्या कालावधीत एखाद्या कामाचे भूमीपूजन करणे आचारसंहितेचा भंग आहे. वेश्वी येथील भूमीपूजन कामांची माहिती घेऊन संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल.
>
> – दाजी ताईंगडे, गटविकास अधिकारी

# एमएमआरडीएविरोधात शेतकरी आक्रमक

। उरण । वार्ताहर ।

एमटीएचएल (अटल सेतू) प्रभाव क्षेत्राजवळचा विकास करण्यासाठी एमएमआरडीएला न्यू टाऊन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी (एनटीडीए) नेमण्याचा शासनाच्या अधिसूचनेला रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल आणि पेण तालुक्यांतील १२४ गावांतून २१ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत. यासंदर्भात अंतिम तारीख सरली असली तरी हरकती नोंदविण्यात येत आहेत.

या हरकतींमध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता घेतलेल्या निर्णयाला विरोध, शेतकऱ्यांनी आपल्यासाठी आणि कुटुंबासाठी बांधलेली घरे आणि भविष्यातील पिढ्यांसाठीची गावठाण आणि सार्वजनिक वापरासाठी भूखंड याबाबतचे हरकती मांडण्यात आल्या आहेत. तसेच मूळ गावठाण शाबूत राहिले पाहिजे, ही पूर्व अट यामध्ये आहे.

**२१ हजारांहून अधिक जणांनी नोंदवल्या हरकती**

> आतापर्यंत सुमारे २५ हजारांपेक्षा अधिक हरकती नोंदविण्यात आल्या आहेत. अद्यापही शेतकरी हरकती नोंदवत आहेत. शेतकऱ्यांना हा प्रकल्प नकोय, हे यावरून सिद्ध झाले आहे. यापुढील लढाईसाठी उरण तालुक्यात २९ गावांतील आणि पनवेल तालुक्यातील सात गावांतील लोकांची समिती गठीत करण्यात येणार असून, त्या समितीद्वारे संयुक्तिकपणे लढा देण्यात येणार आहे.
>
> – रुपेश पाटील, समन्वयक, एमएमआरडीए विरोधी शेतकरी संघर्ष समिती

एमएमआरडीएच्या अधिसूचनेला ७ एप्रिलपर्यंत लेखी हरकती नोंदविता येणार होत्या. कोकण विभागाच्या नगररचना सहसंचालकांनी या पान २ वर




## वे|ध|क

### बस दरीत कोसळून १४ जण ठार

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमध्ये मंगळवारी रात्री एका खासगी कंपनीची बस ५० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला, तर १६ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये अनेक महिलांचाही समावेश आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमधील रायपूर-दुर्ग मार्गावर रात्री उशिरा हा अपघात घडला. पोलीस आणि बचाव पथकाकडून बचावकार्य सुरु होते. अपघातप्रकरणी पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला.

### नाना पटोलेंच्या गाडीला अपघात

**भंडारा :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला आहे. नाना पटोले हे आघाडीचे उमेदवार प्रशांत पडोळे यांचा प्रचार दौरा आटोपून मंगळवारी रात्रीच्या सुमारास सुकळी या गावी जात असताना मागून येणाऱ्या ट्रकने त्यांच्या गाडीला जोराची धडक दिली. यामध्ये पटोले हे थोडक्यात बचावले आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, नाना पटोलेंच्या गाडीच्या मागच्या भागाचा चक्काचूर झाला आहे. मात्र, सुदैवानं नाना पटोले आणि गाडीतील कोणालाही दुखापत झालेली नाही.



● माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे उत्तरकार्य पेझारी येथील निवासस्थानी पार पडले.




# निवडणुकीवर बहिष्कार



**बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांचा इशारा**

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील बाळगंगा धरणग्रस्तांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. १४ वर्षे उलटूनही बाळगंगा धरणाचे काम पूर्ण होत नाही. शेतकऱ्यांना मोबदला मिळत नाही, शेतकऱ्यांचे पुनर्वसन होत नाही, त्यामुळे बाळगंगा धरण होईल की नाही, शेतकऱ्यांचे पुनर्वसन होईल की नाही याबाबत शेतकऱ्यांच्या मनात काहूर माजलेला आहे. म्हणूनच येत्या लोकसभा निवडणुकीत बाळगंगा धरणबाधित सहा ग्रामपंचायतींमधील जनतेने पान २ वर

### शेतकऱ्यांचा विरोध

। कोर्लई । वार्ताहर ।

अदानी पोर्टच्या आगरदांडा येथे होणाऱ्या रेल्वे भूसंपादन मोजणीला येथील स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. येथून जाणारा रेल्वे मार्ग हा गावाबाहेरील महामार्गाच्या बाजूने नेण्यात यावा, तसेच सातबाऱ्यावरील पेन्सिल शेरा रद्द करण्यात यावा आदी मागण्यांसह विरोध दर्शवित मोजणी पान २ वर



## ईद का चाँद दिखतेही
# ऑपरेशन ॲन्टी लोटस शुरु?

आविष्कार देसाई
रायगड

भाजपाच्या मांडीवर बसून सुनील तटकरे निवडणुक लढवत आहेत. सुनील तटकरेंना मत म्हणजे भाजपाला मत हे आता अल्पसंख्याक समाजासह संविधान वाचवण्यासाठी पुढे सरसावलेल्या सर्वच राजकीय पक्ष, विविध समाजातील घटकांनी हेरले आहे. 'इधर ईद का जाँद दिखा, उधर ऑपरेशन ॲन्टी लोटस शुरु...' अशा आशयाचे मेसेज समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. पान २ वर

### अल्पसंख्याक समाजाकडून तटकरेंच्या 'करेक्ट कार्यक्रमा'ची तयारी



> जिल्ह्यातील मुस्लिम, दलित, मराठा, ओबीसी, कष्टकरी, कामगार, महिला, युवा यांना याबाबत जागरुक करण्यात येत असून, प्रत्येक मोहल्ल्यात, वाडी-वस्त्यांवर, चौकात, नाक्यांवर, घरात बैठका घेण्यात येणार आहेत. संविधान वाचवण्याच्या लढाईत आपण इंडिया आघाडीच्या म्हणजे अनंत गीते यांच्यासोबत राहायचे आहे, असा प्रचार करण्यात येणार आहे.
>
> – आमिर खानजादा, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)

'इधर ईद का जाँद दिखा, उधर ऑपरेशन लोटस शुरु होगा, लडाई अब आर पार की है, संविधान बचाने की है, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टी, शिवसेना (उबाठा), काँग्रेस पार्टी अब फॅसिस्ट ताकदों को रायगड से उखाड फेकेंगी, तटकरे को वोट मतलब फॅसिस्ट भाजपा को वोट' असे मेसेज व्हॉट्सॲपच्या 'फ्रिडम ऑफ स्पीच' या ग्रुपवर व्हायरल होऊ लागले आहेत.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

११ एप्रिल

१) श्री. नारायण रामजी कडवे
अलिबाग, ११-४-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**डॉ. नीलोत्पला राजेंद्रकुमार म्हात्रे, वाढदिवस अलिबाग**

# जेएसडब्ल्यूविरोधात शेतकरी आक्रमक

- उच्च दाबाच्या वीजवाहिनीला विरोध कायम
- वारसाला नोकरी देण्याची मागणी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कानसई नागोठणे ते डोलवी येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीत ४००/२२० के.व्ही. ही उच्च वीज दाब वाहिनी टाकण्याच्या कामात कंपनी प्रशासन व संबंधित ठेकेदार यांची मनमानी सुरूच आहे. त्यामुळे या उच्च वीज दाब वाहिनी विरोधात शेतकरी आक्रमक झाले असून एकतर आमची जमीन शासनाच्या नवीन भूसंपादन कायद्यानुसारच्या दराने सरसकट संपादित करावी अथवा बाधित शेतकऱ्यांच्या एका वारसाला कंपनीत नोकरी द्यावी, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

ज्या शेतकऱ्यांच्या जागेतून ही उच्च वीज दाबाची वाहिनी जाणार आहे, त्या शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल होणार आहेत. त्यामुळे अशी जमीन भविष्यात कुणीही विकत घेणार नाही अथवा संबंधित शेतकरी या जागेचा विकासही करु शकणार नाही. त्यामुळेच कंपनी प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात पळस ग्रामपंचायत हद्दीतील पळस, शेतपळस, बाहेरशिव, वाघळी व निडी येथील शेतकऱ्यांनी नुकतीच निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.



(छायाचित्र : महेश पवार)

यावेळी स्थानिक शेतकरी ज्ञानेश्वर शिर्के, चंद्रकांत दुर्गावले, शशिकांत शिर्के, पळस ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच वाघळी येथील रामचंद्र कदम, शेतपळस येथील सदस्य सतीश डाकी, अजित शिर्के, हरिश्चंद्र मढवी, शिवराम कदम, पळस ग्रा. पं.सदस्य सतिश डाकी, विजय विचारे, लक्ष्मण भालेकर, गणेश म्हात्रे आदींसह शेतकरी यावेळी उपस्थित होते.

जेएसडब्ल्यू कंपनीच्या या ३० किलोमीटर लांबीच्या वीजवाहिनीचे सर्वेक्षण करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले नाही. या उच्चदाब वाहिनीपासून दोन्ही बाजूकडील मोठ्या प्रमाणातील शेती बाधित होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. या वाहिनीचे मनोरे उभारण्याचे काम व वीज वाहिन्या टाकण्याचे काम जेएसडब्ल्यू कंपनीने दुसऱ्या एका खासगी कंत्राटदार कंपनीला दिले आहे. असे असतानाच ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून ही उच्चदाब वीजवाहिनी जाणार आहे, त्या शेतकऱ्यांना फसवणुकीने कमी रकमेचे धनादेश देण्याचे काम ठेकेदाराने केले आहे. बाधित शेतकऱ्यांना पटविण्यासाठी गावातील पुढारी असलेल्या एजंटना ठेकेदाराकडून नेमण्यात आल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने शेतकऱ्यांत संतापाची लाट उसळली असून, या प्रकाराला वेगळे वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.




# बंदी असतानाही अवजड वाहतूक सुरू

**। उरण । वार्ताहर ।**

वाहतूक कोंडीची समस्या निर्माण असल्याने दिघोडे-दास्तान मार्गावर संबंधित प्रशासनाने बंद करण्यात आलेली अवजड वाहतूक पुन्हा सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासन डोळेझाकपणा करत आहे की काय, असा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे.

उरण तालुक्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत असल्याने अवजड वाहनांची संख्याही तेवढ्याच प्रमाणात वाढत आहे. वेश्वी, चिर्ले, दिघोडे, विंधणे, चिरनेर, मोठी जुई, कळंबुसरे परिसरात सीएफएस आणि रिकामी कंटेनर यार्ड गोदामे यांच्या वाढत्या संख्येमुळे अवजड वाहनांच्या संख्येत वाढ झाली आहे. अवजड वाहनांमुळे रस्तेही अपुरे पडू लागले आहेत. अवजड वाहनांची मुजोरीही वाढली आहे.

अवजड वाहनांच्या वाढत्या मुजोरीमुळे दिघोडे सर्कल आणि दिघोडे चिर्ले मार्गावर वाहतूक कोंडीच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली होती. त्यामुळे वाहतूक कोंडीचा फटका हा सर्वसामान्य जनतेसह विद्यार्थी वर्गाला बसत आहे.

## लग्नसहित्यासह सोन्याचे भाव गगनाला भिडले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू आहे. लग्न म्हटले की आजच्या युगात गरिबातला गरीब माणूसही लग्नात खर्च करत असतो. परंतु, सध्या सोन्याच्या दरात सतत वाढ होत असल्याने सोन्याचे दागिने खरेदी करताना वधू पालकांचे बजेट कोलमडले. तसेच दागिने, उच्च प्रतीचे कपडे यामध्येसुद्धा वर-वधू पित्यावर चांगलाच खर्च बसत असतो.

पूर्वीची विवाह पद्धती कमी खर्चाची होती. शिवाय बरीच पळस, जांभळीच्या डहाळीचा मांडव तयार करण्यात येत होता. परंतु, आता वृक्षाच्या

# सेंट मेरी स्कूलच्या फी वाढीबाबत युवासेना आक्रमक

- गटविकास अधिकारी, शिक्षण विभागाला निवेदन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागामधील खरसुंडी येथे असलेल्या सेंट मेरी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये अतिरिक्त वाढवलेल्या ३० ते ४० टक्के फीमुळे मागील एक आठवड्यापासून पालकांनी आपल्या मुलांना शाळेत न पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. या वर्षात अचानक भरमसाठ फी वाढल्यामुळे पालकांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. जोपर्यंत फी कमी होत नाही, तोपर्यंत मुलांना शाळेत न पाठविण्याचा निर्णय पालकांनी घेतला.

दरम्यान, शाळा व्यवस्थापकांच्या मनमानी कारभारामुळे पालकांनी आपल्या व्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेनेच्या कॉलेज कक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडे मांडल्या असता युवासेना कॉलेज कक्ष आक्रमक होत १० एप्रिल रोजी खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व शिक्षण विभागाला फी कमी करण्यासाठी निवेदन देत लवकरात लवकर फी कमी करावी, अशी मागणी केली आहे. जर शाळा व्यवस्थापनाने फी कमी न केल्यास ठाकरे गट युवा स्टाईलने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युवासेनेच्या कॉलेज कक्षाचे तालुका अधिकारी प्रतीक शिंदे यांनी यावेळी दिला आहे.

यावेळी युवासेना उपजिल्हाधिकारी महेश पाटील, युवासेना कॉलेज कक्ष कर्जत खालापूर विधानसभा अधिकारी सुजल गायकवाड, उपअधिकारी धर्मेश परमार, प्रतिक शिंदे, जय खेडकर, हरेश कराळे, विनोद पांडे, रिया मालुसरे, शरद घोडविंदे, किशन चौहान, वैभव दळवी, एकनाथ कोळंबे आदींसह पालक मच्छिंद्र पोलेकर, संतोष नलावडे, हेमंत चव्हाण, दृष्टी गुजर, नितीन पाटील, दीपक पाटील, जितेंद्र बोदार्डे, महेश पाटील, गोपीचंद तुपे, अश्विनी बोदार्डे हे उपस्थित होते.

## तरुणाला जबर मारहाण

**। रोहा । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील धाटाव गावात गुढीपाडव्यानिमित्त मराठी नवीन वर्षाची सुरुवातच गावातील तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी देत झाली. या प्रकारात विटा, दगडांचा वापर करून त्या तरुणाला डोक्यात गंभीर दुखापत झाल्याने अक्षरशः रक्तबंबाळ केले असल्याने त्याची प्रकृती चिंताजनक आहे. धाटाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ मंगळवार, दि. ९ एप्रिल रोजी रात्री ९.४५ वाजता फिर्यादी दीपक दगडू पवार (३६) रा. धाटाव याला मागील भांडणाचा मनात राग धरून आरोपी निलेश भोकटे, अजय मोरे, राहुल रटाटे, सागर जाधव, विकी खैरे, पियुष अंबिस्ते, दिनेश रटाटे व मोन्या जाधव सर्वजण रा. धाटाव यांनी मारहाण केली.

# माथेरानमधील सातपैकी तीनच ई-रिक्षा सुरू




**। कर्जत । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील सातपैकी तीनच ई-रिक्षा सुरू असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. सनियंत्रण समितीने ई-रिक्षांची संख्या वाढवावी, अशी मागणी सुहासिनी शिंदे यांनी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दि. २६ डिसेंबरपासून नगरपालिकेने पुन्हा सात ई-रिक्षांसोबत वाहतूक सुरू केली. मात्र, महिन्याभरापासून ई-रिक्षांमध्ये सातत्याने बिघाड होत असल्याने ई-रिक्षाची सेवाच कोलमडून गेली आहे. अवघ्या तीन ई-रिक्षा सुरू असल्याने स्थानिक रहिवासी, विद्यार्थी व पर्यटक यांना तासन तास ई-रिक्षासाठी वाट पाहावी लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाने हातरिक्षा चालकांनाच ई-रिक्षा द्याव्यात असा स्पष्ट आदेश दि. १० जानेवारी रोजी दिला. याची अंमलबजावणीची जबाबदारी सनियंत्रण समितीकडे दिली आहे. असे असतानादेखील ठेकेदारच ई-रिक्षा चालवीत आहे, दि १० जानेवारी रोजी आदेश प्राप्त होताच तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. म्हसे यांनी ई-रिक्षाची संख्या व मार्ग निश्चित करण्यासाठी पाच सदस्यीय कमिटी गठीत केली होती. या कमिटीने आठ हजार रहिवासी, विकेंडला येणारे चार ते पाच पर्यटक व ३५० विद्यार्थी यांची गरज लक्षात घेता चाळीस ई-रिक्षांची सुरुवातीला परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडला होता; परंतु सनियंत्रण समितीच्या काही सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतल्याने सुरुवातीला २० ई-रिक्षा हात रिक्षाचालकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

> शंभर वर्षांनंतर ई-रिक्षासारखी सुरू झालेली सेवा स्वस्त व अत्यंत सोयीची आहे. ई-रिक्षाची संख्या वाढवावी व चोवीस तास सेवा देण्यात यावी.
> – सुहासिनी दाभेकर, सामाजिक कार्यकर्त्या

> माथेरानमधील रस्ते खराब आहेत, पेव्हर ब्लॉकला मान्यता दिली तर रस्ते चांगले होतील आणि रिक्षा सुरळीत सुरू राहतील.
> – सुनील शिंदे

## पान १ वरून

### आमदारांकडून आचारसंहितेचा भंग

रायगड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वेगवेगळ्या समिती गठीत केल्या आहेत. या निवडणुकीत आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी पथक तैनात करण्यात आले आहेत. मतदारांना आमिष दाखविणाऱ्यांवर या पथकाद्वारे कारवाई केली जाते. मात्र, मंगळवारी सकाळी अलिबागमधील वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत विकासकामांचा भूमीपूजन सोहळा शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आला. याबाबत आचारसंहितेचे काम करणाऱ्या गटविकास अधिकारी दाजी ताईंगडे यांना विचारणा केली असता, एखादे प्रलंबित काम करीत असल्यास त्याला आचारसंहितेचे नियम लागू होत नाही. मात्र, कामाचे भूमीपूजन करणे म्हणजे आचारसंहितेचा भंग होतो. अशा प्रकारचे प्रकरण आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाते, असे ते म्हणाले. जिल्ह्यात आचारसंहितेचा भंग होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात गाजावाजा केला जात आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये याबाबत भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे अनेक मंडळी गाव पातळीवर एखादे कार्यक्रम घेतानादेखील विचार करीत आहेत. आचारसंहितेच्या भंगाची भिती सर्वसामान्य नागरिकांच्या मनात प्रशासनाकडून निर्माण केली जाते. मात्र, शिंदे गटातील आमदारांकडून आचारसंहितेचा भंग केला जात आहे. त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ होत आहे. या प्रशासनाच्या कारभाराबाबत नागरिकांकडून नाराजीचे सूर उमटत आहेत.

**मतदारांची फसवणूक**

**निवडणुकीच्या तोंडावर आमदारांनी मतदारांना विकासकामांचे प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. भूमीपूजन सोहळे करुन आमदार नागरिकांची केवळ फसवणूक करीत आहेत.**

### गुढी उभारताना शॉक लागून तरुणाचा मृत्यू

मंडळाला अर्ज विनंती करीत आहेत. पण, विद्युत मंडळाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मराठी नवीन वर्षाच्या प्रारंभी घडलेल्या घटनेने मोरबे धरणग्रस्त ग्रामस्थ सुन्न झाले आहेत. संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. चौक येथील उपअभियंता बोधनकर यांच्याशी संपर्क साधला असता घडलेली घटना दुर्दैवी असल्याचे सांगून याबाबत वरिष्ठांना कळविले आहे. उद्या इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टर येणार असून, जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल, त्याचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात येईल, मयताच्या वारसांना मदत मिळण्यासाठी लागणारी आवश्यक मदत आम्ही करू असे सांगितले. मयत इसम यांना दोन लहान मुले असून, धर्मपत्नी, आई आहे. घरचा कमवता गेल्याने योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### निवडणुकीवर बहिष्कार

मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. बाळगंगा धरण आणि भ्रष्टाचार हे समीकरण पूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे. या धरणाच्या भ्रष्टाचारामध्ये अधिकारी, ठेकेदार यांना निलंबन करण्यात आले. ९ गावे १३ वाड्यांचे विस्थापन करून बाळगंगा धरण प्रस्तापित करण्यात आला. २००९ च्या सुमारास बाळगंगा धरणाची मंजुरी मिळाली आणि २०१० ला त्याचे काम सुरू झाले. बाळगंगा धरणाच्या भ्रष्टाचाराम ुळेच २०१४ ला राज्यात भाजपचा सरकार आले. जलसिंचन विभागामधील मोठ्या प्रमाणात होणारा भ्रष्टाचार भाजपवाल्यांनी शोधून काढला. साधारणतः या प्रकल्पाची किंमत अंदाजे ३६८ कोटी होती. नंतरच्या काळात ती ४० टक्क्यांनी वाढून ४८८ कोटी झाली. परंतु, नंतरच्या काळात ही रक्कम १५० टक्क्यांनी वाढून १२२० कोटी करण्यात आली. असे असले तरी यामध्ये ९ महसुली गावे आणि १३ वाड्यांच्या धरण बाधित शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात आल्याने जावळी, वरसई, करोटी, निधवली, गागोदे आणि वाशिवली या एकूण सहा ग्रामपंचायतींनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा पवित्रा घेतला आहे. धरण बाधित शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय शासनाला माहीत असूनदेखील शासन मूग गिळून गप्प आहेत. त्यामुळे बहिष्काराचा पवित्रा जनसामान्यांना घ्यावा लागला आहे.

बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न अपूर्णच आहेत. आम्ही गेली १४ वर्षे अनेक आंदोलन केलीत, न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या शेतकऱ्यांनावर गुन्हे दाखल झाले आहेत. परंतु, शासनाला जाग येत नाही. केंद्रात व राज्यामध्ये सत्ता असूनसुद्धा प्रलंबित प्रश्न लोकप्रतिनिधींना ते सोडवता येत नसतील, तर यांना मतदान का करावे? त्यामुळे येथील प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

- अविनाश पाटील, अध्यक्ष, बाळगंगा व संघर्ष समिती

बाळगंगा धरणग्रस्त सहा ग्रामपंचायतींची तातडीने बैठक लावून मतदानावर बहिष्काराबाबत सकारात्मक चर्चा केली जाईल.

- तानाजी शेजाळ, तहसीलदार

### ऑपरेशन अ‍ॅन्टी लोटस शुरु?

जिल्ह्यातील मुस्लिम समाज हा तटकरेंच्या कार्यप्रणालीवर नाराज आहे. खासदार असताना तटकरेंनी समाजासाठी विशेष असे काहीच केले नाही. याबाबत समाजातील नेत्यांनी उद्धव ठाकरे, अनंत गीते यांच्याकडे नाराजी बोलून दाखवली आहे. तसेच विविध प्रचार सभेत हे प्रश्न विशेष अधोरेखित झाले आहेत. आता तर तटकरे हे भाजपाच्या मांडीवर बसले असल्याने ते आपले प्रश्न कसे सोडवतील, असा सवाल अल्पसंख्याक समाजाच्या मनात असल्याचे बोलले जाते. देशाचे संविधान बदलण्याची भाषा भाजपाचे नेते जाहीररित्या बोलत असल्याने दलित समाज कमालीचा नाराज झाल्याचे चित्र आहे. इंडिया आघाडीने संविधान वाचवण्यासाठी लढाई उभी केली आहे. त्यांच्या या लढाईत समविचारी पक्ष, सामाजिक संघटना, संस्था जोडल्या जात आहेत. मराठा आरक्षणावरुन मराठा आणि ओबीसी समाजात सरकारविरोधात उघड नाराजी असल्याचे लपलेले नाही. त्यामुळे भाजपाच्या नाराजीचा फटका हा तटकरेंना बसणार असल्याचे प्रकर्षाने जाणवते. रायगड लोकसभा मतदारसंघात शिवसेनेच्या अनंत गीते यांना तटकरेंच्या विरोधात उतरवण्यात आले आहे. इंडिया आघाडीच संविधान वाचवून देशाला तारु शकेल, असा विश्वास मतदारांमध्ये निर्माण करण्यात येत असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी बोलून दाखवला. त्यांच्या सभादेखील मतदारसंघात पार पडत आहेत. त्यामध्ये त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते. देशाच्या जडणघडणीत मुस्लिम समाजाचे योगदान आहे, हे कोणीच नाकारु शकत नाही. मात्र, भाजपाचा अजेंडा हा अल्पसंख्याक विरोधी आहे. तटकरे हे आता भाजपाच्या मांडीवर जाऊन बसले आहेत. त्यामुळे तटकरेंना मत म्हणजे भाजपाला (मोदींना) मत जाणार आहे. याला आता आम्ही आधीपासूनच विरोध सुरु केला असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष आमिर खानजादा यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले.

### एमएमआरडीएविरोधात शेतकरी आक्रमक

हरकती नोंदवून घेतल्या आहेत. त्याची मोजणी करण्यात येणार आहे. एमएमआरडीएने जाहीर केलेल्या अधिसूचनेला शेतकऱ्यांनी आतापर्यंत हरकती नोंदविल्या आहेत. येथील गावातील जमिनीच्या परिसराच्या विकासाची जबाबदारी शासनाने सिडकोऐवजी एमएमआरडीएला दिली आहे. राज्य सरकारकडून ४ मार्च रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार उरण, पेण आणि पनवेल तालुक्यातील १२४ गावांसाठी नवनगर विकास प्राधिकरण म्हणून एमएमआरडीएची नेमणूक केली आहे. सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, तिसरा मजला येथे शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी जमून या हरकती नोंदविल्या. शासनाने जाहीर केलेल्या अधिसूचनेला ७ एप्रिलपर्यंत हरकती नोंदवून घेण्यात आल्याची माहिती कोकण विभागाचे नगररचना सहसंचालक जितेंद्र भोपळे यांनी दिली.

### शेतकऱ्यांचा विरोध

होऊ दिली नाही. महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख (मुरुड-जंजिरा) विभागाने येथील शेतकऱ्यांना बुधवार, दि.१० एप्रिल रोजी आगरदांडा येथे रेल्वे भूसंपादन मोजणीसाठी संयुक्त नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार सकाळी ९.३० वाजता प्रत्यक्ष जागेवर हजर राहण्याचे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे येथील जमीन मोजणीला संबंधित शेतकऱ्यांनी उपस्थित राहून सदरचा रेल्वे मार्ग हा गावाबाहेरील महामार्गापासून नेण्यात यावा तसेच सातबाऱ्यावरील पेन्सिल शेरा रद्द करण्यात यावा, अशी मागणी करत मोजणी होऊ दिली नाही.

यावेळी मुरुडच्या भूमी अभिलेखचे निमतानदार एम.पी. पोकळे, सहकारी तसेच रुषिकांत डोंगरीकर, यूसुफ अर्जबेगी, संतोष पाटील, आशिष हेदूलकर, अर्पेश चिंदरकर, शब्बीर काझी, नजीर खतीब, तहसिन बशीर फकी, इमुद्दीन कादिरी, अहीर, मुब्बशिर खतीब शेतकरी उपस्थित होते.

# शासकीय कार्यालये ठेकेदारीच्या विळख्यात

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान हे ब्रिटिशकालीन मुंबई, पुण्यापासून अगदी जवळचे छोटेसे पर्यटनस्थळ आहे. या ठिकाणी ब्रिटिश राजवटीपासून वीज, पाणी यासारख्या सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. या आजही सुरू आहेत. परंतु, या सुविधा आता ठेकेदार कर्मचाऱ्यांवर विसंबून असल्याचे चिन्ह माथेरानमध्ये दिसत आहे. सरकारी नोकरीतून सेवामुक्त झाल्यानंतर येथे पुन्हा भरती होत नाही, तर त्या जागी ठेकेदारीतून कर्मचारी नियुक्त केला जात असल्याने माथेरानमधील शासकीय कार्यालय आता बहुतांश ठेकेदारीच्या कर्मचाऱ्यांवरच अवलंबून असल्याचे चित्र सर्वच खात्यात दिसून येत आहे.



माथेरानमध्ये नगरपालिका कार्यालयामध्ये बहुतेक पदेही रिक्त असून, त्यांची कामे पाहण्याकरिता ठेकेदारी पद्धतीवर नियुक्त केलेल्या लोकांवर अवलंबून राहावे लागते. अनेक जण येथून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागा भरल्या गेल्या नाही. त्यामुळे येथे अधिकारी उपलब्ध नसल्यास त्या जागी ठेकेदार कर्मचारी उपस्थित असल्याने अनेक वेळा नागरिकांना त्रासास सामोरे जावे लागते. माथेरानमधील नगरपालिकेच्या माध्यमातून सफाई कामगार बांधकाम विभाग नगरपालिका कार्यालय त्याचप्रमाणे प्रवासी करसारख्या अनेक विभागांमध्ये १४० होऊन अधिक कर्मचारी ठेकेदारीद्वारे नियुक्त्या करून त्यांच्यामार्फत काम पाहिले जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात ठेकेदारी पद्धतीने नियुक्ती केल्यामुळे येथील स्थानिक तरुणांना नगरपालिकेमध्ये नोकरीचा वावच राहिलेला नाही.

येथील पर्यटनाच्या दृष्टिकोनातून सर्वात महत्त्वाचा आहे तो पाणीपुरवठा विभाग. या विभागामध्ये सध्या बावीस कर्मचारी हे ठेकेदारी पद्धतीने नियुक्त केले गेले आहेत. वॉलमन, फिल्टर हाऊस व इतर ठिकाणी ते कार्यरत आहेत. येथे कायम सरकारी नियुक्त कर्मचारी हे बोटावर मोजणे इतकेच आहेत. त्यामुळे या ठिकाणीही ठेकेदारी पद्धतीने नियुक्त केलेल्या तरुणांना अति अल्प वेतनावर नोकरी करावी लागत आहे. येथे कोणतेही नोकरीचे साधन नसल्याने या तरुणांना नाईलाजाने या पद्धतीने नोकरी करावी लागत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारी खात्यामध्ये कार्य करत असल्याने ठेकेदारी कर्मचारी शासकीय कामे करताना पहावयास मिळतात, ही फार मोठी चिंतेची बाब आहे, त्यामुळे यावर निर्णय होणे गरजेचे असून शासकीय कार्यालयांना ठेकेदारी मुक्त करणे हे आता शासनाच्या हातामध्येच आहे.

## नववर्षाचा उत्साह

**चौल :** अलिबाग तालुक्यातील चौल परिसरात हिंदू नववर्ष आणि गुढीपाडव्याच सण उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त बाजारपेठाही सजल्या होत्या. ग्राहकांचीही खरेदीसाठी गर्दी झाल्याचे पाहावयास मिळाले. काही ठिकाणी मिरवणुका, मोटारसायकली रॅली काढण्यात आल्या होत्या.

# श्रीवर्धन-मीरज मार्गावर बसचा अपघात

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन-बोर्लीपंचतन-मीरज या मार्गावर नेहमी अत्यंत जुन्या व भंगार बसेसच सोडण्यात येत असल्याची प्रवाशांची तक्रार आहे. दरम्यान, सोमवारी मीरजहून ही बस बोर्लीपंचतनजवळ वडवली फाट्याजवळ आली असता बसमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटून बस दहा फूट खोल खड्ड्यामध्ये पलटी झाली.

या बसमध्ये एकूण ३४ प्रवासी प्रवास करत होते. यामधील वीस प्रवाशांना किरकोळ स्वरूपाची दुखापत झाली आहे. श्रीवर्धन आगारामध्ये नवीन बसेस उपलब्ध असताना लांब पल्ल्याच्या मार्गावरती जुनी व भंगार बस का सोडण्यात होती? याबाबत खुलासा केलेला नाही. अशा घाटामध्ये तांत्रिक बिघाड झाला असता तर मोठ्या प्रमाणावर बस अपघातग्रस्त होऊन जीवितहानीदेखील झाली असती. आगारात असलेल्या लाल रंगाच्या बसेस या अगोदर निमआराम बस होत्या. तरी आगाराने या ठिकाणी नवीन बस द्यावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

# किल्ले सुरगडावरील चिऱ्यांचे केले संवर्धन

**। गोवे-कोलाड । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात तसेच रोहा तालुक्यातील खांब विभागातील ऐतिहासिक शिवकालीन आसलेल्या सुरगड किल्ल्यावर स्थानिक सुरगड संस्थेची गड संवर्धन मोहीम राबवण्यात आली. स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेची २९ मोहीम यशस्वी संपन्न झाली.

सदर मोहिमेमध्ये उत्तर बुरूजाकडील गाळमुक्त केलेल्या टाकीतील मोठे दगड, चिरे काढण्याचे काम करण्यात आले. ते काम पूर्ण झाल्यानंतर सुरगडाच्या शिलेदारांनी बालेकिल्ल्यातील पाण्याचं टाकं साफ करण्यास सुरूवात केली. हे टाकं १७ फुट लांब तर ९ फूट रूंद आहे. त्यातील सव्वादोन फुटापासून तब्बल ६ फुटांपर्यंत एका कोपऱ्यातील चिखल गाळ, दगड गोठे काढण्यात शिलेदारांना यश आले आहे. या टाकीच्या गाळामध्ये आज एक मोठा तळखडा सापडला. सदरील तळखडा टाकीच्या बाजूलाच वर उभा करून ठेवण्यात शिलेदार यशस्वी झाले आहेत.



**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. महेंद्र शिवाजी बेरगळ रा. राजबाग कॉंप्लेक्स, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालक श्री. अशोक नरहरी सामंत रा. ३०२, ३रा मजला, गणराज प्रसाद, सी. एच. एस. कौशल्या हॉस्पिटल जवळ, गणेश वाडी, ठाणे महाराष्ट्र ४००६०१ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड बिनशेती मिळकत**

| स.नं/हि.नं. | क्षेत्र चौ.मीटर. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३८५/१ | ३७६.२० | ३७.६२ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील बिनशेती मिळकती मध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार वकील यांच्याकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- ११/०४/२०२४

सही/-
**ॲड.गीतांजली जी. फुलावरे**
कार्यालय पत्ता: "मधुतारा" बिल्डींग, कचेरी रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड.
मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

**निवडक**

## मद्य विकणाऱ्यावर कारवाई

**पनवेल :** मद्यविक्री करणाऱ्या संतोष खैरे (५३ रा. करंजाडे) याच्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. करंजाडे, सेक्टर ६ येथील किराणा दुकानामध्ये एक व्यक्ती विनापरवाना मद्यविक्री करत असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी किराणा दुकानामध्ये संतोष खैरे हे मद्यविक्री करत असल्याचे दिसून आले. त्याच्याकडून हजारो रुपये किमतीचे मद्य जप्त करण्यात आले.

## मोटारसायकलसह रकमेची चोरी

**पनवेल :** चायनीज हॉटेलच्या गल्ल्यामधून रोख रक्कम व मोटारसायकल चोरून नेल्याप्रकरणी सैफ शेख या कुक विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण गुंजाळ यांचे चायनिजचे दुकान आहे. या चायनीजवर त्यांनी सैफ शेख हा कुक कामासाठी ठेवला होता. गुंजाळ यांनी पैसे दुकानाच्या खणामध्ये ठेवले होते. ते पैसे न सापडल्याने त्यांनी कुक सैफ शेखला संपर्क साधला, मात्र झाला नाही. तो हॉटेललाही परत आला नाही. त्यामुळे गुंजाळ यांनी पोलीसात तक्रार दाखल केली.

## लॅपटॉपसह ५० हजारांची चोरी

**पनवेल :** गाडीची काच फोडून लॅपटॉपसह ५० हजार रुपयांची रक्कम चोरी केल्याची घटना खारघरमध्ये घडली. नदीम तशरीफ शेख हे गाडी पार्क करून एका दुकानात कपडे घ्यायला गेले, मात्र परत आल्यावर त्यांच्या गाडीच्या मागच्या बाजूची काच फोडून त्यातील लॅपटॉप, पासपोर्ट तसेच आवश्यक ओळखपत्र व गाडीतील ४० हजार रुपयांची रोकड असा ५० हजारांचा मुद्देमाल चोराने लंपास केल्याचे लक्षात येताच. नदीम यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## सोन्याची चेन खेचून पसार

**पनवेल :** पनवेल एसटी आगार ते खांदा कॉलनी असे रस्त्याने पायी जात असताना एका ६५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन जबरीने चोरून नेणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सुवर्णा लांजेकर या रस्त्याने पायी जात असताना आरोपी मोहित कोहली व करण कोहली या दोघांनी त्यांच्या गळ्यातील ५० हजार रुपयांची सोन्याची चेन पळवून नेली होती. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली होती.

## ‘उज्वल’ संग्रहाचे लोकार्पण

**धाटाव :** शिक्षिका उज्वला देशमुख लिखित उज्वल काव्यसंग्रहाचे लोकार्पण करण्यात आले.या काव्यसंग्रहाचा साहित्यिकांना व वाचक वर्गाला चांगला उपयोग होणार आहे. उज्वला देशमुख यांना लिहणे आणि वाचनाच्या सवयीमुळे कविता, लेख लिहिण्याबरोबर नाट्यलेखनाचा छंद जडला. हळूहळू लेखन करून त्यांनी सर्व संग्रहित करून ठेवले. या लोकार्पणाप्रसंगी स्पंदन नाट्य संस्थेच्या संस्थापक स्नेहाआंब्रे,पूजा पोटफोडे,उदय देशमुख, स्पंदन संस्थेच्या पदाधिकारी आदी उपस्थित होते.












# पेझारीत हरिपाठ कीर्तन



## माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांना अभिवादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री यांचे उत्तरकार्य बुधवारी (दि. १०) पेझारी येथे त्यांच्या राहत्या घरी झाले. या निमित्त विधीवत पूजा झाल्यावर हरिपाठ किर्तनाचा कार्यक्रम पार पडला.

यावेळी शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील, भाजपचे जिल्हा अध्यक्ष तथा माजी आ. धैर्यशील पाटील, शिवसेनेचे नेते बबन पाटील यांच्यासह शेकापचे जिल्हा चिटणीस मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच अंत्ययात्रेला हजारोच्या संख्येने वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. गेली दहा दिवस विविध क्षेत्रातील मंडळींनी पेझारी येथे येऊन पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले.

पेझारी येथे मीनाक्षी पाटील यांचे उत्तरकार्य त्यांच्या राहत्या घरी झाले. यावेळी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, राजन पाटील, अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील,मीनाक्षी पाटील यांचे सुपुत्र ॲड. आस्वाद पाटील, स्नुषा चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, निता पाटील, शैला पाटील, साधना पाटील, गौतम पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, सवाई पाटील, सुमना पाटील, सर्व नगरसेवक, पदाधिकारी आदी पाटील कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. अश्विनीताई म्हात्रे यांनी हरिपाठ कीर्तन केले.

# अलिबाग नगरपरिषदेचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

अलिबाग नगरपरिषदेमार्फत शहरातील भिंती रंगवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. मात्र शहरातील स्वच्छतेकडे अलिबाग नगरपरिषदेचे दुर्लक्ष असल्याचे समोर आले आहे. महावीर चौक ते जुन्या नगरपरिषदेच्या मार्गावर रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा पडलेला असून दारूच्या बाटल्यादेखील याठिकाणी आढळून आल्या. मात्र तो परिसरच प्रशासनाने कचऱ्यापासून मुक्त केलेला नाही.





अलिबाग नगरपरिषदेवर प्रशासनामार्फत कारभार सुरु आहे. शहरातील वेगवेगळे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत केला जातो. मात्र त्यावर ठोस कार्यवाही होत नसल्याचे समोर आले आहे. अलिबाग शहरातील अनेक भिंतीना रंग देण्यात आले. वेगवेगळे समाजप्रबोधनाचे चित्र काढून नागरिकांपर्यंत संदेश पोहचविण्याचा प्रयत्न केला. स्वच्छतेचा संदेशदेखील यातून देण्याचा प्रयत्न केला. मात्र ज्या नगरपरिषदेकडून जनजागृती केली जाते. त्याच नगरपरिषदेची अवस्था ‘दुसऱ्या देई ब्रम्हज्ञान स्वतः कोरडे पाषण ’ अशी झाली आहे. अलिबाग शहरातील महावीर चौक ते जुनी नगरपालिका या मार्गावर अय्यंगार बेकरीजवळच कचऱ्याचा ढिगारा पडलेला आहे. बाजूला दारुच्या बाटल्या पडलेल्या दिसून आल्या आहेत. प्राजक्ता हॉटेल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मधोमध कठड्याला काटेरी झाडांनी विळखा घातला आहे. वर्दळीच्या मार्गावर अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा व सुरक्षेचा प्रश्नदेखील गंभीर होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मुख्याधिकारी तथा प्रशासक अंगाई सांळुखे याकडे लक्ष देतील का असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

> **अलिबाग शहरातील स्वच्छतेबाबत निष्काळजीपणा करणाऱ्या ठेकेदाराविरोधात यापूर्वीदेखील कारवाई केली आहे. शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास टाळाटाळ होत असल्यास पुन्हा एकदा त्यांच्यविरोधात कारवाई करून तेथील कचरा काढून परिसर स्वच्छ केला जाईल.**
>
> **– अंगाई सांळुखे**
> **मुख्याधिकारी तथा प्रशासक**
> **अलिबाग नगरपरिषद**

# कारची दुभाजकाला धडक; चालकाचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने पनवेलजवळील खारपाडा येथील टोलनाक्याच्या दुभाजकाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात कार चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. त्यांनतर गाडी जळून खाक झाली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय शंकर राठोड हे त्यांच्या ताब्यातील होंडाई कंपनीची आय २० कार क्र. एमएच ६ बीयु ०८७५ ही भरधाव वेगात, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून पनवेलकडून पेणकडे जात होते. मुंबई गोवा महामार्गावरील खारपाडा टोलनाका येथील दुभाजकाला कारची धडक बसली. या अपघातात विजय शंकर राठोड यांच्या पायाला, छातीला, डोक्याला गंभीर दुखापत झाली. या गंभीर दुखापतींमुळे विजय राठोड यांचा मृत्यू झाला. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## कोर्लईमध्ये प्रकट दिनानिमित विविध कार्यक्रम उत्साहात

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील चिकणी येथे सामाजिक कार्यकर्ते भिकेश दिवेकर यांच्या निवासस्थानी श्री स्वामी समर्थ प्रगट दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

बुधवारी सकाळी श्री स्वामी समर्थ यांची विधिवत पूजाअर्चा करण्यात आली. यावेळी बुवा चंद्रकांत जंगम यांनी पौरोहित्य केले. प्रकटदिनाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून दुपारी भाविकांसाठी भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.काशिद येथील बुवा दत्ताराम बेलोसे, मोरे ग्रामस्थ मंडळ, रमेश दिवेकर, नांदगाव खारीकवाडा दिलिप पेडणेकर, नरेश भेर्ले, शंकर महाडीक,आदाड येथील विलास भुरे, अनंत कदम यांच्या सुश्राव्य बहारदार भजनांचा भाविकांनी आस्वाद घेतला.

## श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

प.पु. सदगुरु नाना महाराज परांजपे यांच्या कृपाशिर्वादाने बुधवारी श्री स्वामी समर्थ मठ गावदेवी पाडा, पनवेल येथे श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा झाला असून मोठ्या प्रमाणात स्वामी सेवकांनी यात सहभाग घेऊन सेवेचा लाभ घेतला.

या निमित्ताने मठाधिपती गुरुवर्य सुधाकर घरत यांच्या मार्गदर्शनाखाली पहाटे श्रींची काकड आरती, नित्य नैमित्तिक पूजा प्रसाद, लघुरुद्र पूजा, सद्गुरू पाद्यपूजा, श्रींची आरती व प्रसाद, श्री वृत्तगायत्री होमहवन, प्रकट दिन सोहळा, श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत पोथीचे सामूहिक पारायण, श्री स्वामी समर्थ महिला मंडळाचे भजन, प. पू. गुरुवर्य सुधाकर घरत प्रवचन, श्रीस्वामींची महाआरती, व उपस्थिती हजारो स्वामी सेवकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्री स्वामी समर्थ भजन मंडळ तर्फे भजनाचे आयोजन करण्यात आले होते.



# बाईक रॅलीतून मतदार जनजागृती


**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अलिबाग शहरामध्ये बाईर रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून शहरातील नागरिक, मतदार, व पर्यटकांना मतदानाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



रायगड लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी प्रशासन कामाला लागले आहे. मतदानाचा टक्का वाढावा, तरुण मतदारांसह महिला व अन्य मतदारांची संख्या वाढावी यासाठी प्रशासनाने जनजागृती शहरी भागासह ग्रामीण भागात सुरु केली आहे. अलिबागमध्ये बुधवारी (दि.१०) एप्रिल रोजी जिल्हा निवडणूक विभागाच्या वतीने उत्सव लोकशाहीचा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमानिमित्त अलिबाग शहरामध्ये बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचून त्यांना मतदानाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा फडकवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरु झाली.

यावेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवडणूक विभागाच्या उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे, अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, लायन्स क्लबचे सदस्य प्रिझम संस्थेचे पदाधिकारी, सभासद, वेगवेगळ्या विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या रॅलीमध्ये पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी तसेच महसूल विभागाचे कर्मचारी, महिला बचत गट, शाळेतील विद्यार्थी, नागरिकदेखील सहभागी झाले होते.



# पुन्हा इतिहास घडेल

महाविकास आघाडीचे जागावाटप अखेर जाहीर झाले. गुढीपाडव्याला संयुक्त पत्रकार परिषदेत याची घोषणा करण्यात आली. त्यासाठी उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांच्या सोबतच शेकापचे जयंत पाटील आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अशोक ढवळे, समाजवादी पक्षाचे रईस शेख हेदेखील हजर होते ही आश्वासक बाब आहे. जागावाटप झाले तरी आघाडीतील सर्व मतभेद संपले आहेत असे नव्हे. सांगली, भिवंडी, मुंबई अशा जागांवरून काँग्रेसमध्ये थोडी नाराजी आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष परभणीची जागा स्वतंत्रपणे लढवतो आहे. तेथे पक्षाचे लढाऊ कार्यकर्ते राजन क्षीरसागर उभे आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षालाही काहीशी मनाविरुध्द हिंगोलीची जागा घ्यावी लागली आहे. त्यामुळे तळाच्या स्तरावर थोडी चलबिचल असणे स्वाभाविक आहे. मात्र ती बाजूला टाकून काँग्रेस व इतर पक्षांचे नेते एका व्यासपीठावर आले हेच महत्वाचे आहे. नरेंद्र मोदी यांच्या भाजपचा पराभव करणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असून कार्यकर्त्यांनी आता कामाला लागावे हे नाना पटोले यांनी केलेले आवाहन सर्वच पक्षीयांना लागू पडते. काही प्रसंग असे असतात की पक्षीय राजकारण काही काळ बाजूला ठेवून एका विशिष्ट उद्दिष्टासाठी एकत्र यावे लागते. जगाला हलवून टाकणाऱ्या रशियन राज्यक्रांतीच्या काळातही लेनिनच्या नेतृत्वाखालील गटाने मेन्शेविकांशी काही काळ सहकार्य केले होतेच. तो डावपेचांचा भाग असल्याचे त्याच्या डोक्यात स्पष्ट होते. आज देशात नरेंद्र मोदी यांच्या सरकारने जवळपास हुकुमशाही प्रस्थापित केली आहे. येत्या निवडणुकीनंतर मोदींना पुन्हा बहुमत मिळालेच तर त्यांच्या राक्षसी पकडीमुळे लोकशाही जिवंत राहणे कठीण आहे. याला अटकाव करण्याची गरज निर्माण झाली आहे. महाविकास आघाडीतील सर्व पक्ष आज याच भूमिकेत आहेत. मोदी सरकार घालवलेच पाहिजे अशी तीव्र भावना जनतेतही निर्माण झाली असून तिचे प्रतिनिधित्व करायला आघाडी सज्ज झाली आहे.

## देशाचे प्रश्न

आपल्याकडे निवडणूक लोकसभेची असो की नगरपालिकेची, रस्ते,पाणी अशा समस्यांची चर्चा अधिक होते. आपला देश गरीब आहे. बहुतांश भागात या मूलभूत सोई अजून पोचलेल्या नाहीत. किंवा त्यांची अवस्था फार वाईट आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निमित्ताने प्रचारासाठी समोर येणाऱ्यांना याबाबतच सवाल केले जातात. त्यात गैर असे काही नाही. मात्र लोकसभेत निवडून जाणारा प्रतिनिधी देशाचे धोरण व कायदे ठरवतो याचे भान ठेवायला हवे. सध्या तर देशाची सर्व सत्ता दिल्लीत केंद्रीत झाली आहे. राज्यांनाच नव्हे तर ग्रामपंचायतींना किती पैसे मिळणार यातही केंद्राचा हस्तक्षेप चालू आहे. दुसरे म्हणजे, मोदींच्या केंद्र सरकारने देशाचे सामाजिक वातावरण पुरते नासवले आहे. प्रत्येक प्रश्नाला हिंदू विरुध्द मुस्लिम असा रंग दिला जातो. अयोध्येत रामाचे मंदिर झाले याचा आनंदही साधा सरळ नसतो. मुस्लिमांना धडा शिकवला ही भावना त्यात जास्त प्रबळ असते. खुद्द मोदी यांच्यासह सर्व नेते या भावनेला खतपाणीघालत राहतात. या राजकारणामुळे देशात दुफळी माजली आहे. याचे दूरगामी भीषण परिणाम होण्याचा धोका आहे. या धोरणांना विरोध करणाऱ्यांची फळी दिल्लीत मजबूत होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोदींच्या विरोधात उभ्या असलेल्या महाविकास आघाडीच्या कोणत्याही उमेदवाराला मते द्या अशी भूमिका आघाडीला घ्यावी लागणार आहे. जनतेला या प्रश्नाचे महत्व व तातडी पटवून देणे ही आघाडीसमोरची कसोटी आहे. आता जागावाटपावर शिक्कामोर्तब झाल्याने आघाडीचे नेते सर्व राज्यभर एकत्रित सभा व परिषदा घेऊन याबाबत जनजागरण करतील अशी अपेक्षा आहे. शत्रूची ताकद मोठी आहे. त्याच्याकडे प्रंचड पैसा आहे. शिवाय मिडिया पूर्ण कबजात आहे. या सर्वांशी लढायचे तर आघाडीच्या नेत्यांना एकजूट व एकवाक्यता दाखवणे अपरिहार्य ठरणार आहे.

## उन्मत्तांना जमिनीवर आणा

जनता, विशेषतः मराठी जनता, गेल्या पाच वर्षात डोळे उघडे ठेवून राज्यातील राजकारणाचे दशावतार पाहत आहे. सत्तेची हाव आणि गुर्मी यापायी दिल्लीकर मोदी व शाह यांनी दोन पक्ष फोडले. कायदे धाब्यावर बसवून राज्याची सत्ता ताब्यात घेतली. इतके होऊनही फोडाफोड्या आजतागायत चालू आहेत. या सर्वांचा हिशेब चुकता करण्याचा अवसर कधी मिळतो याची जनता वाट पाहते आहे. मात्र या जनतेवर मतदानाला जाण्याआधी तिला विविध आमिषे दाखवली जात आहेत. ती त्यांना बळी पडू नये यासाठी जनतेच्या प्रबोधनाची मोठी मोहिम हाती घ्यावी लागणार आहे. उदाहरणार्थ निवडणूक रोख्यांमध्ये मोदींच्या भाजपने हजारो कोटींचा भ्रष्टाचार केला आहे. कंपन्यांना कंत्राटे देण्यासाठी तसेच आपल्यावरील कारवाया थांबवण्यासाठी भाजपला देणग्या द्याव्या लागल्या असाव्यात. याबाबत ठोस कागदोपत्री तपशील नसले तरी परिस्थितीजन्य पुरावे पुरेसे बोलके आहेत. बोफोर्सच्या प्रकरणात काँग्रेसला ६४ कोटी रुपयांची लाच मिळाली अशी आवई उठवण्यात आली. त्यावरून राजीव गांधी सरकारचा पराभव झाला. पण भाजप सरकारने आजतागायत बोफोर्स प्रकरणी कारवाई केलेली नाही. निवडणूक रोख्यांचे प्रकरण अधिक ठोस व भरपूर पुरावे असलेले आहे. वेदान्त, कोटक महिन्द्र, मेघा इंजिनिअरिंग किंवा अनेक औषधी कंपन्यांवर मोदी सरकारने कृपेचा वर्षाव केलेला स्पष्ट दिसतो आहे. त्या बदल्यात या कंपन्यांनी हजारो कोटींच्या देणग्या दिल्या आहेत. हा ढळढळीत भ्रष्टाचार असूनही मोदी सरकार सर्व काही कायद्याने झाल्याचे म्हणत आहे. हे सरकार पुन्हा निवडले गेले तर आपल्या भ्रष्टाचाराला खुद्द जनतेचाही पाठिंबा आहे असा दावा करायलाही ते मागेपुढे पाहणार नाही. त्यामुळे याला हाणून पाडणारा विरोधी पक्ष बळकट असणे आवश्यक आहे. आघाडीचे ऐक्य दिसले तर जनतेला ते पटवून देणे अधिक सोपे जाईल. आघाडीच्या नेत्यांनी आता मतभेदांची जाहीर वाच्यता टाळून शक्यतो एकत्रित प्रचार मोहिम राबवायला हवी. दिल्लीतले सत्ताधीश मदांध होऊन उन्मत्त वागू लागले की त्यांना जमिनीवर आणण्याची जबाबदारी महाराष्ट्राने इतिहासात अनेकदा पार पाडली आहे. यंदा तिचा पुन्हा प्रत्यय येईल.

विचार

# विरोधी पक्षांचे विखुरलेले सैन्य!

**विरोधी पक्षाच्या 'इंडिया' आघाडीतील सर्व पक्ष एकदिलाने उभे राहिले असले तरी भाजपला तोंड देण्यास समर्थ आहेत का, असा प्रश्न पडतो. ममता बॅनर्जी यांनी बंगालमध्ये काँग्रेस, डाव्यांना एकही जागा सोडली नाही तर महाविकास आघाडी महाराष्ट्रात चार ठिकाणी मैत्रीपूर्ण लढाईची भाषा करत आहे. पंजाबमध्येही काँग्रेस 'आप'विरोधात उभी ठाकली आहे. एकंदरीत, विरोधकांची एकजूट होत आहे, पण हे सैन्य विखुरलेले आहे.**



राही भिडे

झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेने विरोधी पक्ष धास्तावले आहेत. केंद्र सरकारच्या तपास यंत्रणा कधी आणि कशात अडकवतील, हे सांगता येत नाही, अशी सर्वांची भावना झाली आहे. दुसरीकडे, विरोधी पक्षाच्या 'इंडिया' आघाडीतील सर्व पक्षांचे त्यावर एकमत आहे का आणि भाजपला तोंड देण्यास हे विरोधकांचे सैन्य समर्थ आहे का, या प्रश्नांची उत्तरे अजूनही नकारार्थी आहेत. कारण रामलीला मैदानावर विरोधी पक्षाचे नेते भाजपच्या तपास यंत्रणांविरोधात आवाज उठवत होते, तेव्हा मीरतमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांची खिल्ली उडवत होते आणि मी कुणालाही घाबरणार नाही, तर कोणी कितीही मोठा असला, तरी भ्रष्ट व्यक्तींविरोधात लढाई सुरूच ठेवणार असल्याचे सांगत होते. रामलीला मैदानात तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओब्रायन 'इंडिया' आघाडीत सहभागी असल्याचे सांगत असताना तिकडे कोलकात्यात त्यांच्याच पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी मात्र काँग्रेस आणि डाव्यांना भाजपच्या हस्तक समजत होत्या. आणखी एक गंमत म्हणजे ममता बॅनर्जी, शरद पवार, उद्धव ठाकरे मोदींच्या 'चारशे पार'ची खिल्ली उडवत असताना त्यांच्या भूमिका मात्र भाजपचा फायदा करून देणाऱ्या ठरत होत्या. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस, डाव्यांना एकही जागा देण्याच्या लायकीचे समजले नाही तर मुंबईतील दोन जागा, भिवंडी आणि सांगलीमध्ये मैत्रीपूर्ण लढाईची महाआघाडीची भाषा म्हणजे मोदी यांना एक एक जागा जिंकून देण्यासाठी उचललेली पावले मानता येतील. अशा नानाविध घडामोडींमुळे विरोधकांची एकजूट होत आहे खरी, पण हे सैन्य विखुरलेले भासत आहे.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे दिल्लीतील भाषण 'इंडिया' आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालणारे ठरते. 'प्रथम एक व्हायला शिका, एकमेकांना जोडायला शिका. आघाडीत विविधता आहे; परंतु विरोधी पक्ष मोठ्या उद्दिष्टांसाठी एकत्र आहेत. केरळमध्ये आम्ही डाव्यांशी लढतो; पण मोठ्या उद्देशांसाठी एकत्र येतो,' असे ते सांगत असताना रामलीला मैदानावरही 'आप' आणि काँग्रेसचे कार्यकर्ते वेगवेगळ्या गटात उभे असल्याचे दिसले. 'आप'च्या कार्यकर्त्यांचे पिवळे टी-शर्ट आणि टोप्या मोठ्या प्रमाणात दिसत होत्या आणि त्यांचे कार्यकर्ते आणि समर्थक पाणी वाटून लोकांना रस्ता दाखवताना दिसत होते. या कार्यकर्त्यांमध्येही पंजाबमधून आलेल्यांची संख्या अधिक होती. दिल्लीच्या रॅलीने एक मात्र झाले. विरोधकांमध्ये एकी नसली, तरी ते घाबरलेले नाहीत, हे पहायला मिळाले. कथित दारू घोटाळ्यात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेमुळे विरोधकांवर दबाव येईल, असे मोदी सरकारला वाटले असेल, तर तसे ते नाही. 'सेव्ह डेमोक्रसी रॅली' नावाच्या या रॅलीमध्ये झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि केजरीवाल यांच्या अटकेचा निषेध करताना तामिळनाडूपासून काश्मीर आणि महाराष्ट्रापर्यंतचे राजकीय पक्ष एकवटलेले दिसले. एवढेच नाही, तर कार्यक्रम संपेपर्यंत या रॅलीत राजकीय पक्षांनी एकजूट दाखवली. रामलीला मैदान पूर्ण क्षमतेने भरले होते. ज्या दिवशी पंतप्रधानांनी उत्तर प्रदेशातील मीरतमधून भाजपचा निवडणुकीचा बिगुल वाजवला, त्याच दिवशी दिल्लीमध्ये विरोधी एकजुटीचा हा कार्यक्रम झाला.

या रॅलीप्रसंगी खर्गे यांनी आपल्या भाषणात भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विष म्हणून उल्लेख केला. 'ते चाटून बघण्याचा प्रयत्न करू नका, कारण ते घातक ठरू शकते, असा इशारा त्यांनी दिला. राहुल गांधी यांच्यानंतर फक्त खर्गे यांनीच संघाचे नाव घेतले. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला आणि राहुल गांधी यांनी आपापल्या परीने संविधान धोक्यात असल्याचे सांगितले. मोदी सरकार निवडणूक आयोग आणि इतर संस्थांच्या सहकार्याने ही संपूर्ण निवडणूक एका फिक्स मॅचप्रमाणे पार पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप राहुल यांनी केला. संविधान बदलायचा प्रयत्न केला, तर देशाचे विघटन होण्याचा धोका निर्माण होईल, असा इशारा त्यांनी दिला. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे बेकायदेशीर घोषित केले. छापे आणि अटकेनंतर अनेक कंपन्यांनी भाजपला देणगी दिल्याचे दिसून आले. दबावामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप विरोधकांनी केला. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी सोरेन आणि केजरीवाल यांच्या अटकेवर जर्मनी, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिक्रियेमुळे जगात भारताचा अपमान झाला आहे, असा सूर लावला. रामलीला मैदानावरील त्यांच्या संभाषणात सुनीता केजरीवाल नेहमीपेक्षा अधिक आत्मविश्वासाने वावरताना दिसल्या. गेल्या आठवड्यात त्यांचा जनतेशी झालेला हा तिसरा थेट संवाद आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांचा प्रभाव गर्दीपुरता मर्यादित होता.

दिल्लीला लागून असलेल्या उत्तर प्रदेशमधील समाजवादी पक्षाचे नेते वगळता येथे एकही कार्यकर्ता दिसला नाही. सर्व दावे करूनही विरोधी ऐक्याबाबतची परिस्थिती आणि चेहरा अजूनही स्पष्ट झालेला नाही. निवडणुकीचा महिना सुरू झाला असून विरोधी आघाडीसमोर हे मोठे आव्हान आहे. दिल्लीतील रामलीला मैदानावर विरोधी आघाडीची भव्य सभा झाली. यात २८ पक्षांच्या नेत्यांनी सहभाग घेऊन मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. विशेष म्हणजे या रॅलीमध्ये अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन आणि संजय सिंह यांच्या पत्नीही सहभागी झाल्या होत्या. जवळपास प्रत्येक वक्त्याने मोदी सरकारला हुकूमशहा आणि लोकशाहीला धोका असल्याचे वर्णन केले. या मेगा रॅलीला 'लोकशाही वाचवा रॅली' असे नाव देण्यात आले; मात्र केजरीवाल यांच्या समर्थनार्थ रॅलीचे स्वरूप देण्याचा आम आदमी पक्षाचा प्रयत्न होता. अर्थात विरोधी पक्षांची एकत्रित निवडणूक रॅली म्हणून या घटनेकडे पाहणे योग्य ठरेल. दिल्लीतील रामलीला मैदानात जिथे 'इंडिया' आघाडीची रॅली झाली, ते मैदान अनेक ऐतिहासिक रॅली आणि घटनांचे साक्षीदार आहे. केजरीवाल स्वतः या रामलीला मैदानातून नेता म्हणून पुढे आले. त्यांनी अण्णा हजारे यांना पुढे घेऊन 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' आंदोलन सुरू केले आणि त्यानंतर परिस्थिती बदलली. याच रामलीला मैदानावर इंदिरा गांधींच्या आणीबाणीच्या विरोधातही रॅली काढण्यात आली आणि सत्ता परिवर्तनाची सुरुवातही तिथूनच झाली.

मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या विरोधात राजकीय मोहीम राबवणे आणि स्वतःसाठी पाठिंबा मिळवणे हा या रॅलीचा एकमेव उद्देश होता. ही काही नवी बाब नाही. निवडणुकीचे वातावरण असताना विरोधकही रॅली काढून स्वत:साठी पाठिंबा मागतील. जवळपास अजिंक्य मानल्या जाणाऱ्या मोदींविरोधात लढताना विरोधक कमकुवत झाले नसून पूर्ण ताकदीने लढण्यास सज्ज असल्याचा संदेश त्यांनी जनतेला दिला. गेल्या काही दिवसांपासून सुनीता केजरीवाल ज्या प्रकारे आपल्या पतीला पाठिंबा मिळवून देत असून त्यांच्यासाठी विधाने करत आहेत, त्याला थोडी सहानुभूती मिळण्याची शक्यता आहे; पण कल्पना सोरेन मात्र आक्रमक दिसल्या. त्यात 'ना दैन्यम, ना पलायनम' अशी भावना होती. बाकी, मोर्चे होत आहेत आणि नक्कीच होतील. त्यामुळे ही रॅली कुठल्या भूतकाळाची किंवा भविष्याची रॅली नव्हती. राजकारणात काही वेळा सर्व काही स्पष्टपणे सांगितले जात नसले तरी 'बिटवीन द लाइन्स' वाचावे लागते. या रॅलीने काँग्रेस आणि आम आदमी पक्षातील विरोधाभासही अधोरेखित केला. केजरीवाल यांच्या अटकेने जर्मनी, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांना चिंता वाटावी असे काही विशेष नाही. त्यांचे राजकारण नेहमीच 'चतुर युक्त्यां'चे राहिले आहे. पक्ष आणि अरविंद एवढ्या मोठ्या संकटात असताना त्यांच्या पक्षाचे दोन मोठे नेते स्वाती मालीवाल आणि राघव चड्ढा परदेश दौऱ्यावर होते. त्याची चर्चा होणे स्वाभावीक आहे. अण्णांच्या काळातल्या परकीय शक्तींनीही भरपूर पैसा दिला आणि केजरीवाल यांची प्रतिमाही निर्माण केली. तीच कसरत पुन्हा एकदा केली जात आहे; मात्र एकूणच ही बाब भाजपसाठी फायद्याची आहे. केजरीवाल यांना मिळालेल्या पाठिंब्याने राहुल गांधींची प्रतिमा झाकोळली आहे. केरळमध्ये लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि डावे पक्ष आमने-सामने आहेत. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस एकमेकांना विरोध करत राजकीय मैदानात उतरले आहेत. पंजाबमध्ये आम आदमी पक्ष आणि काँग्रेसचे नेते एकमेकांना कडाडून विरोध करत निवडणूक लढवत आहेत. असे असतानाही लोकशाही बचाव रॅलीत विरोधी पक्षांचे सर्व बडे नेते एका मंचावर जमले. यामुळे युतीला ऑक्सिजन मिळाल्याचे विरोधी आघाडीच्या नेत्यांचे मत आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या या कथित एकजुटीमुळे स्वतंत्रपणे निवडणूक लढवूनही आघाडीचे पक्ष एकत्र कसे मानायचे, असा मुद्दा पुढे आला आहे.

आजकाल

# मुनंगटीवाराच्या वक्तव्याच्या निमित्ताने

मेधा कुलकर्णी

आता या यादीत सुधीर मुनगंटीवारांच्या वक्तव्याची भर पडली. खरं तर स्त्रियांविषयीची अशी विकृत वक्तव्य कुणीही केलेली असली तरी खपवून घ्यायला नकोतच.

'बेटी बचाओ बेटी पढाओ' ही आपल्या पंतप्रधानांनी केलेली घोषणा. केंद्र सरकारच्या महिलांसाठी अन्य योजनादेखील आहेत. उज्वला, देना शक्ती योजना, महिला शक्ती केंद्र, उद्योगिनी, राष्ट्रीय महिला कोश वगैरे.

पण प्रत्यक्षात सत्ताधारी भाजपची नेतेमंडळी, यात स्त्रीनेत्याही आहेत, लोकप्रतिनिधी आहेतच, आजी-माजी मंत्रीही आहेत, संघाचे मोहन भागवत आहेत आणि स्वतः पंतप्रधानही आहेतच. या सगळ्यांचा मुलींकडे, स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन दूषित आहे, हे त्यांनी वेळोवेळी केलेल्या वक्तव्यांवरून कळतं. सहजच काही विधानं आठवतात. आपले जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांचं लग्न त्या काळाला अनुसरून लहान वयात झालं होतं. त्यावर, - विचार करा, ते लग्नानंतर काय करत असतील? - महाराष्ट्राच्या राज्यपालपदी असताना भगतसिंग कोश्यारी यांनी ही कमेंट केली होती. आणि नंतर ते हसलेदेखील होते. मायावती या देशातल्या महत्वाच्या नेत्या आहेत. त्यांच्याविषयी उत्तर प्रदेशच्या भाजप नेत्या साधना सिंग यांनी म्हटलं - मायावती या ना स्त्री आहेत, ना पुरुष. त्या छक्क्यांपेक्षाही वाईट आहेत. बिहारच्या नेत्या राबडी देवी यांच्याविषयी केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे यांचं वक्तव्य हे की - राबडी देवी यांनी घुंघटातच राहाणं उत्तम. म्हणजे मर्यादेतच राहावं.

गलिच्छ बोलण्यासाठी गांधी कुटुंबीय हा तर भाजपाईंचा आवडता विषय. राहुल गांधींनी २०१९ साली घोषणा दिली होती की चौकीदार चोर है. त्यावर हिमाचल प्रदेशातले भाजप नेता सत्पाल सिंह सत्ती म्हणाले होते की - राहुल म्हणतोय की चौकीदार चोर आहे तर तो, म्हणजे राहुल मादर आहे.

राहुल आणि प्रियांका कमांडोजच्या घेराव्यात जन्मले तर कमंडोच्या घोळक्यातच त्यांना दूध पाजलं जायचं का? असं म्हटलं जितू वाघानी, गुजरात भाजपनेता यांनी. स्त्रियांना पुरुषांबरोबर सर्व बाबतीत सामानतेची आवश्यकता नाही - हे कर्नाटकच्या भाजप नेत्या भारती शेट्टी यांचं विधान. आमच्याकडे सत्ता आहे, संघटना आहे. आम्ही पोलिसांना बालविवाह थांबवायला देणार नाही- असं म्हणाल्याशोभाचौहान,राजस्थानच्याभाजपनेत्या.मुलग्यांनाउद्देशून मुंबईतले भाजप नेता राम कदम म्हणाले होते - तुम्ही सांगाल त्या मुलीला पळवून आणून तुमच्याशी लग्न लावून देईन. बलात्काराविषयी भाजप नेत्यांची वक्तव्य तर लाज आणणारी वाटतात. बलात्कार हा सामाजिक गुन्हा आहे, जो कधी योग्य तर कधी अयोग्य असतो. सरकार बलात्कार थांबवू शकत नाही - असं मध्यप्रदेशचे भाजप नेता बाबुलाल गौर म्हणालेत. बलात्कार इंडियामधे होतात, भारतात नाही - असं म्हणालेत, आरएसएस प्रमुख मोहन भागवत, २०१३ साली. लहान मुलांवर होणारे बलात्कार घृणास्पद आहेत. एक वेळ मुली स्त्रियांवर झालेले समजू शकतो - असं वक्तव्य भाजप नेता रमेश बैस यांचं. सध्या हे आपल्या राज्याचे राज्यपाल आहेत. मुद्दाम कोणी बलात्कार करत नाही. चुकून होतात हे विधान रामसेवक पाइक्रा, छत्तीसगडचे भाजप नेता यांचं. आणि गुजरातचे भाजपनेता सी के राउलजी यांनी तर म्हटलं की - बिल्किस बानोचे बलात्कारी संस्कारी होते. स्त्रियांविषयीचा असा दृष्टिकोन फक्त भारतीय जनता पक्ष, आरएसएस वा यांच्याशी संबंधितांचाच आहे, असं मुळीच नाही.

एकूणच भारतीय राजकारण अजूनही पुरूषसत्ताक आहे. ते सरंजामी पद्धतीने ते चालतं. त्यामुळे स्त्रियांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारे नेते सगळ्याच पक्षांमध्ये आहेत. आणि त्याचाही आपण निषेधच करायला हवा. १५ ऑगस्ट २०२२ साली स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान मोदींनी महिलांचा अनादर करू नका असा संदेश दिला होता. त्यांनी तर याचा आदर्श घालून द्यायला हवा. पण ते स्वतः बोलतात, तसं त्यांचं स्वतःचं आचरण आहे का? उलट, स्त्रियांविषयी अनेक अनेक अपमानास्पद वक्तव्य करणारे मोदीजी भारताचे पहिलेच पंतप्रधान आहेत. २०२१ साली पश्चिम बंगाल राज्याच्या विधानसभा निवडणूक प्रचारातल्या अनेक भाषणांत मोदीजींनी तिथल्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना उद्देशून - दीदी ओ दीदी - फारच आक्षेपार्ह पद्धतीने म्हणत राहिले. कुणी विरोधकाने भाजपला उद्देशून असं म्हटलं असतं तर निवडणूक आयोगाने नक्कीच कारवाई केली असती. काँग्रेसच्या कोणत्या विधवेच्या खात्यात पैसे जातात - असं सोनिया गांधी यांना उद्देशून त्यांनी डिसेंबर २०१८ साली विचारलं होतं. त्याही आधी २०१२ साली, काँग्रेस नेता शशी थरूर यांच्या पत्नी सुनंदा पुष्कर यांचं वर्णन पंतप्रधानांनी - पचास करोडकी गर्लफ्रेंड - असं केलं होतं. २०१८ साली काँग्रेस नेत्या रेणुका चौधरी यांना उद्देशून राज्यसभेत पंतप्रधान म्हणाले होते की - रामायणानंतर शूर्पणखेसारखं राक्षसी हसणं, म्हणजे रेणुका यांचं, प्रथमच ऐकलं. बांग्ला देशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्याबद्दलच्या त्यांच्या विधानावरदेखील टीका झाली होती. २०१५ साली ते म्हणाले होते की - स्त्री असूनदेखील' त्या दहशतवाद सहन करत नाहीत. आणि आता ताजं वक्तव्य मंत्रीमहोदय मुनगंटीवार यांचं. तर, मुद्दा असा की, स्त्रियांविषयी असा दूषित दृष्टिकोन बाळगणाऱ्यांच्या हाती देशातल्या महिलांचं भवितव्य सुरक्षित राहील का?

लोकसंसद

## महाराष्ट्रातील पशुधन वाचवणे जरुरीचे

महाराष्ट्रात यंदा दुष्काळाची तीव्रता अधिक आहे. राज्यात एकूण २२९२ महसुली मंडळे आहेत. त्यातील सुमारे ६६ टक्के महसुली मंडळात दुष्काळ जाहीर झाला आहे. महाराष्ट्रात सरासरी ३५ टक्के पाणी साठा आहे. गतवर्षी तो ४५ टक्के साठा होता विशेषतः मराठवाडा विभागात पाण्याची परिस्थिती तीव्र आहे. कित्येक शहराचा तापमानाचा पारा ४० अंश किंवा त्यापेक्षा अधिक या अवस्थेत पोहचला आहे. अजूनही एप्रिल व मे तसेच जून महिन्याचे काही दिवस जाणे बाकी आहेत. त्यामुळे पाण्याची परिस्थिती अवघड अवस्थेत पोहचणार आहे. कोयना धरणात सुद्धा पाणी साठा कमी आहे. त्याचा परिणाम वीज निर्मितीवर होत आहे. काही दिवसांनी पाण्याबरोबरच विजेचे संकट घोंघावणार असे चित्र दिसू लागले आहे. जे पशुधन आहे ते वाचविणे जरुरीचे आहे. त्यासाठी काही ठिकाणी चारा छावण्या सुरु करणे आवश्यक आहे. सरकारने यास प्राधान्य द्यावे. पाण्याबरोबरच चाऱ्याची सुद्धा परिस्थिती अवघड आहे राज्य सरकारने व केंद्र सरकारने यात लक्ष घालणे जरुरीचे आहे.

**- शांताराम वाघ,** पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**अकरा एप्रिल**

**१८२७:-** 'गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असूड' अशा भेदक लिखाणातून आणि कृतींतून सामाजिक क्रांतीचा पुरस्कार करणारे आधुनिक महाराष्ट्रातील कृतिशील विचारवंत, सत्यशोधक समाजाचे संस्थापक, लेखक महात्मा जोतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म. थॉमस पेनच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या जोतिबांनी आपल्या लेखनातून चातुर्वर्ण्य, त्यातून उद्‌भवलेला जातिभेद आणि या भेदाचा सर्वाधिक फायदा उपटू पाहणारा तत्कालिन ब्राणवर्ग यांच्यावर कोरडे ओढून सामाजिक बदलांची वाट खुली केली. 'शेतकऱ्यांचा असूड' या पुस्तकातून त्यांनी केलेली शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची मीमांसा आजच्या कार्यकर्त्यांनाही अभ्यासाची दिशा दाखविणारी आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या पुस्तकातून फुले यांनी धर्मकल्पनांना फेकून न देता मानवी नैतिक धारणांशी धर्माचा संबंध पुन्हा स्थापन केला. याखेरीज 'चमत्कारिक गोष्टी', 'बालबोध गोष्टी', 'यात्रेकऱ्यांचा वृत्तांत', 'सत्सार' इत्यादी पुस्तके. अनेक 'अखंड' (अभंगवजा रचना) तसेच 'शिवाजीचा पोवाडा' ही फुले यांची साहित्यसंपदा होय. **१८२७:-** ख्रिस्ती मिशनरी मिसेस मेरी एल मिचेस यांचा जन्म. मराठीतून त्यांनी काव्यरचना केली. **१९०६:-** लेखक, संस्कृत, प्राकृत व कोकणी भाषेचे अभ्यासक सुमित्र मंगेश कर्वे यांचा जन्म. 'ऐतिहासिक महाकोश योजने'चे संस्थापक संपादक. **१९१२:-** शीघ्रकवी विश्वनाथ दत्तात्रय देशपांडे यांचा जन्म. वक्त्याचे भाषण ऐकताच त्याच्या काव्यात्मक सारांश तयार करण्यात त्यांचा हातखंड होता. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, शंकराचार्य, श्रीधरस्वामी ह्यांच्या भाषणांच्यावर केलेल्या शीघ्रकाव्याला तत्कालिन रसिकांनी दाद दिली. 'मेजवानी' हा विनोदी विडंबन काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९१९:-** कवी आणि 'निरंजन' या टोपण नावाने चाळीस एक कथा लिहिणारे कथाकार वसंत सदाशिव बल्लाळ यांचा जन्म. 'ईश्वरभक्ति', 'राष्ट्रप्रिती' आणि 'संसारा' विषयीची सहानुभूती प्रकट करणारी त्यांची कविता आहे. याची प्रचिती 'स्नेहदीप' या स्फूट काव्यसंग्रहातून दिसून येते. 'शशिकला' हे खंडकाव्य सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारे आहे. **१९२४:-** नाटककार विनायक त्र्यंबक मोडक यांचे निधन. 'राणा भीमदेव उर्फ खरा राजपूत' हे त्यांचे नाटक गाजले. ते त्यांनी वा. र. शिरवळकर यांच्या सहकार्याने लिहिले होते. याशिवाय 'श्री ज्ञानेश्वर महाराज' हे नाटक, महादजी शिंद्यांचे चरित्र, श्री विक्रमादित्य' ही ऐतिहासिक तर 'मौनयौवना' ही सामाजिक कांदबरी लिहिली. मात्र ही सर्व पुस्तके सहकार्याने लिहिली होती तथापि त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेली साहित्यप्रकृती म्हणजे 'प्रणयविवाह' हे विनोदी नाटक. **१९३३:-** भाषांतरकर्ते, कांदबरीकार, नाटककार अखोडकर कृष्णराव नानाजी उर्फ कृष्णाजी नारायण यांचे निधन. लेखनाची सुरुवात भाषांतरित साहित्याने. 'नवजीवन : संगीत हाच परिणाम, संगीत दुरंगी दुनिया आणि ऐतिहासिक पण कल्पनारम्य प्रकृतीचे 'अग्रहार' हे नाटक. त्या काळातील मुंबईतल्या वेश्यांच्या जीवनासंबंधीची 'कोजागिरी' ही कांदबरी त्यांची गाजली. याशिवाय 'काटेरी बाजार', 'विलासी कांता', 'धर्माच्या नावाखाली' या सामाजिक कांदबऱ्या त्यांनी लिहिल्या. तसेच त्यांच्या 'तीन आणे माला' या कथामालेतून २५कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. 'उसन्या सासूबाई', 'साखरपुडा', 'अंतरपाठ' या त्यांच्या कथा गाजल्या. **१९३३:-** पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, लेखक प्रा. रामचंद्र गोविंद ताकवडे यांचा जन्म. ह्यांचे पंचवीस एक संशोधनात्मक लेख प्रसिध्द झाले असून ह्यांचा 'क्वाँटम यांत्रिकीची मूलतत्त्वे' हा ग्रंथ 'क्वाँटम' यंत्राचा परिचय करुन देणारा ग्रंथ प्रसिध्द. **१९३५:-** कवी वसंत सावंत यांचा जन्म. पाच काव्यसंग्रह व 'प्रवासवर्णन: एक वाङ्:मय प्रकार' हा प्रबंध त्यांनी लिहिला आहे. **१९४४:-** ख्यातनाम पत्रकार, लेखक, अनुवादक अशोक जैन यांचा जन्म. विविध वृत्तपत्रातून लिखाण करणाऱ्या जैन यांनी विपूल लिखाण केले. त्यात पुपुल जयकर यांनी इंदिरा गांधीवर लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचा अत्यंत रसाळ शैलीत मराठीत अनुवाद केला. तसेच नरसिंहराव यांनी लिहिलेल्या 'द नसायडर'चा मराठीत अनुवाद. याशिवाय पी.सी. अलेक्झांडर, आर. लक्ष्मण, आर के नारायण, अरुण गांधीफ आदी नावाजलेल्या लेखकांच्या पुस्तकांचा मराठीत अनुवाद केला. **१९५०:-** मराठीसह हिंदीतून लेखन करणारे डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा जन्म. आत्मकथा, लेखसंग्रह, कथासंग्रह, भाषणसंग्रह, काव्यसंग्रह, भाषांतर, संपादन, समीक्षात्मक असे चौफेर लेखन त्यांनी केली आहे. **१९६२:-** साहित्य जगतात 'सुमेध वडावाला' या नावाने प्रसिध्द असणारे कथा, कादंबरी लेखक सुमेध श्रीकृष्ण रिसबुड यांचा जन्म. 'डफलीवाले', 'बाजार' या कथेमुळे वाचकांचा लक्ष वेधून घेणारा लेखक अशी त्यांची ख्याती झाली. मानवी वासनाविकारांवर धीटपणे चित्रण करणारा शैलीदार आणि बिनधास्त लेखक अशी प्रतिभा साहित्य जगतात त्यांची निर्माण झाली. 'सांजवा', 'चांदणफुला', 'अनुभवंती' मिळून १०हून अधिक कथासंग्रह. 'आई ती आईच आहे' (आत्मकथन), 'आठवणी काही काही माणसं', 'तृष्णा', 'धर्मयुध्द', 'ब्रह्मकमळ' या कादंबऱ्या, 'दोन चाकं झपाटलेली' हे प्रवासवर्णन थोरवी हे माहितीपर, 'मनश्री' हे व्यक्तिचित्रण, 'मी नंदा' (आत्मचरित्र, सहलेखिका डॉ. नंदा केशव मेश्राम), रुपाली रेळेची सागरी झेप : जल आक्रमिले अशी साहित्य संपदा.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# भाजपवर गजानन किर्तीकरांची नाराजी

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवसेनेचे शिंदे गटाचे खा. गजानन कीर्तिकर शिवसेना ठाकरे गटातर्फे यंदाची लोकसभा निवडणूक लढणारा मुलगा अमोल कीर्तिकर यांच्या विरोधात प्रचार करणार आहेत. पण सध्या सुरू असलेल्या ईडी चौकशीवर ते कमालीचे नाराज आहेत. भाजपाच्या सरकारने माझ्या मुलाला अकारण लक्ष्य केले असल्याचा आरोप खा. गजानन कीर्तिकर यांनी माध्यमांशी बोलताना केला. ते म्हणाले, की कोरोना काळातील कोणत्याही गैरव्यवहाराशी अमोल याचा कसलाही संबंध नाही. त्यात काहीही काळेबेरे नसताना अमोलला चौकशीसाठी बोलावले जाणे हे वाईट आहे. भाजप ज्या प्रकारे यंत्रणांचा वापर करते आहे, ते योग्य नाही. अमोल आणि मी एकाच घरात रहातो. आम्ही भोजनाच्या टेबलवर एकत्र असतो. मात्र, तो उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसमवेत राहणार असल्याने मी विरोधात प्रचार करणार आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारानुसार चाललेली शिवसेना उद्धव ठाकरे यांनी भलत्याच दिशेला वळवली. हा बदल मला मान्य नव्हता. उद्धव ठाकरे यांच्याशी माझे संबंध राहिले नाहीत. ते योग्य प्रकारे संवाद ठेवत नव्हते. त्यामुळे मी शिंदे यांनी उठाव करताच त्यांच्यासमवेत गेलो. अमोल तिथेच राहून त्यांच्याकडून उमेदवार झाला आहे. मी त्याच्या विरोधात प्रचार करणार हे निश्चित, असे ते म्हणाले.



# भाजप पदाधिकारी ना'राज'

## ठाण्यातील उत्तर भारतीय पदाधिकारी थेट मातोश्रीवर





। ठाणे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मंगळवारी (दि.९) गुढीपाडवा मेळाव्यात आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मनसे महायुतीला पाठिंबा देणार असल्याचे त्यांनी सांगितले. देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या खंबीर नेत्याची गरज आहे. त्यामुळेच आपण महायुतीला पाठिंबा देत असल्याचे यांनी सांगितले. यांच्या या घोषणेनंतर भाजपसह महायुतीतील प्रमुख निर्णयांनी घटक पक्षांनी यांच्या निर्णयाचे स्वागत केले.

मात्र, महायुतीने यांचा पाठिंबा घेतल्याने ठाण्यातील भाजपचे उत्तर भारतीय पदाधिकारी संतापले आहेत. राज ठाकरे यांनी सुरुवातीच्या काळात परप्रांतीयांविरोधात जोरदार आघाडी घेतली होती.

मनसेच्या या आंदोलनावेळी बिहार आणि उत्तर प्रदेशातून आलेल्या नागरिकांना मनसैनिकांनी चोप दिला होता. त्यामुळे यांची अँटी-उत्तर भारतीय इमेज तयार झाली होती. त्याची सल अजूनही उत्तर भारतीय समाजाच्या मनात आहे. त्यामुळेच यांनी महायुतीला दिलेल्या पाठिंब्यामुळे ठाण्यातील भाजपचे पदाधिकारी नाराज झाले होते. या नाराज पदाधिकाऱ्यांनी राज ठाकरेंचा पाठिंबा घेणाऱ्या भाजपला सोडचिठ्ठी देत ठाकरे गटात प्रवेश केला आहे. राज ठाकरे महायुतीत सामील झाल्याने ठाण्यातील भाजपच्या उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे सांगितले जाते. ज्या राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांना कायम त्रास दिला, 'उत्तर भारतीय हटाव', अशी भूमिका घेतली त्यांना महायुतीत घेतल्याने अनेक भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा देऊन खासदार राजन विचारे यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे गटात पक्ष प्रवेश केला. उत्तर भारतीय आणि हिंदी भाषिक यांच्यात थोडी नाराजी आहे. त्यातला एक भाग म्हणून कालच या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिला आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

शिवसेना ठाकरे गटात सामील झाल्याचे खा. राजन विचारे यांनी सांगितले. भाजपच्या या नाराज पदाधिकाऱ्यांनी थेट मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मनगटावर शिवबंधन बांधून घेतले.

# काँग्रेसच्या स्टार प्रचारकांचा विदर्भात झंझावात



। मुंबई । वृत्तसंस्था ।

पूर्व विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या सभा होणार असून, त्यात पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, नेते राहुल गांधी व सरचिटणीस प्रियांका गांधी यांचा समावेश आहे. या नेत्यांच्या कन्हान, साकोली व चंद्रपूर येथे या सभा होणार आहेत. पहिल्या टप्प्यात विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा या लोकसभा मतदारसंघांमध्ये येत्या १९ एप्रिलला मतदान होणार आहे. यासाठी साकोली (भंडारा), कन्हान (रामटेक) व चंद्रपूर येथे या जाहीरसभांचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ एप्रिलला राहुल यांची जाहीर सभा भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे डॉ. प्रशांत पडोळे यांच्या प्रचारासाठी होणार आहे. १४ एप्रिलला मल्लिकार्जुन खर्गे नागपूरमध्ये आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ते दीक्षाभूमीला भेट देऊन अभिवादन करतील. मतदारसंघांच्या सीमेवर असलेल्या गावाची या प्रचारसभेसाठी निवड करण्यात आली आहे. रामटेकमध्ये श्याम बर्वे हे काँग्रेसचे उमेदवार आहेत.

## वे|ध|क

### भावना गवळी यांची मनधरणी

**वाशिम :** सलग पाच वेळा यवतमाळ-वाशिम मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भावना गवळी यांची लोकसभेमधून उमेदवारी डावलण्यात आली आहे. त्यामुळे भावना गवळी नाराज आहेत. मात्र, त्यांची मनधरणी करण्यासाठी शिंदेसेनेचे उदय सामंत आणि अर्जुन खोतकर यांनी आज भावना गवळी यांच्या रिसोड येथील निवस्थानी भेट दिली. यावेळी त्यांची भावना गवळी यांच्यासोबत जवळपास दीड तास चर्चा झाली.

### व्हॉट्सअपमुळे चर्चा रंगली

**रत्नागिरी :** रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघावरुन अद्यापही शिंदे गट आणि भाजपमध्ये एकमत झाल्याचे दिसत नाही. एकीकडे शिंदे गटाकडून उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत यांना उमेदवारी दिली जाण्याची चर्चा असताना, राणे मात्र, माघार घेण्याच्या तयारीत नाहीत. राणे वारंवार निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त करत असताना शिंदे गटातील आमदारांमध्ये अस्वस्थता असल्याची चर्चा आहे. या सर्व घडामोडींदरम्यान किरण सामंत यांच्या व्हॉट्सअप स्टेटसमुळे चर्चा रंगली आहे. शिंदे गटाकडून सामंत रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहेत.

### देवरा दक्षिण मुंबईतून लढण्यास इच्छूक

**मुंबई :** दक्षिण मुंबई ही माझी जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. माझे वडील मुरलीभाई देवरा यांच्यापासून आम्ही राजकारणात सक्रिय राहून काम करतोय. यामुळे या मतदारसंघाशी माझे भावनिक नाते आहे. या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास आजही मी इच्छुक आहे. मात्र, याचा सर्वश्री निर्णय आमचे पक्षप्रमुख, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घ्यायचा आहे, असे मत शिवसेनेचे नेते माजी खासदार मिलिंद देवरा यांनी व्यक्त केले.

# माढ्यातून धैर्यशील मोहितेंना उमेदवारी



। माढा । प्रतिनिधी ।

भाजपाचे धैर्यशील मोहिते महायुतीकडून माढा लोकसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक होते. पण भाजपाने विद्यमान खा. रणजीत सिंह निंबाळकर यांना उमेदवारी दिल्याने नाराजी पसरली होती. त्यामुळे मोहिते पाटील आणि निंबाळकर घराण्यानं बैठकी सुद्धा घेतल्या. पण प्रवेश हा कुठे घ्यायचा यासाठी ते कार्यकर्त्यांशी बातचीत करत होते. अखेर धैर्यशील मोहिते शनिवारी (दि.१३) शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत.

माढा लोकसभेची जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीर करण्यात आली नव्हती. वेट अँड वॉच ची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसकडून घेण्यात आली होती. परंतु, धैर्यशील मोहिते यांचा पक्ष प्रवेश निश्चित झालेला आहे. अगोदर पक्ष प्रवेश करूनच उमेदवारी द्यायची, यावर शरद पवार ठाम होते.

पश्चिम महाराष्ट्रातील मोठी मोहिते पाटील आणि निंबाळकर हे वजनदार घराणे आहेत. त्यांचे मोठ्या प्रमाणात सोलापूर आणि माढामध्ये वर्चस्व आहे. त्याचा फायदा शरद पवार यांच्या पक्षालासुद्धा मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या नाराजीवर मार्ग काढण्याचा देवेंद्र फडवणीस अखेरपर्यंत मार्ग काढत होते.

मात्र, त्यांना यश आले नसल्याचे दिसत आहे. धैर्यशील मोहिते पाटील अकलुजमधील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुलात शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटांकडून कार्यकर्त्यांनासुद्धा सोलापूरमध्ये येण्याचं आवाहन करण्यात आलेलं आहे. धैर्यशील मोहिते पाटील हे शरद पवार गटात प्रवेश करत असताना मोहिते पाटलातील कोणते नेते आणि पदाधिकारी या मंचावर उपस्थित राहणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# साताऱ्याचा तिढा सुटला

## शशिकांत शिंदे यांना उमेदवारी



। सातारा । प्रतिनिधी ।

संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या साताऱ्याच्या जागेचा सस्पेन्स आता संपला आहे. आघाडीकडून साताऱ्याच्या उमेदवाराचं नाव जाहीर झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून आता शशिकांत शिदे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

मविआचा साताऱ्यातील उमेदवार कोण याबाबत चर्चा सुरू होती. मध्यंतरी या जागेसाठी पृथ्वीराज चव्हाण यांचे नावही चर्चेत आले होते. मात्र, आता शशिकांत शिंदे हे साताऱ्यातून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत.

श्रीनिवास पाटील यांनी लढण्यास नकार दिल्यानंतर साताऱ्यातील पेच निर्माण झाला होता. साताऱ्यासाठी शरद पवार गटातून तीन उमेदवार इच्छुक होते. मात्र, ही जागा काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांना सोडण्यात येणार असल्याची जोरदार चर्चा होती. स्वत: पृथ्वीराज चव्हाण यांनीही साताऱ्यातून लढण्यास इच्छुक असल्याचे म्हटले होते. त्यामुळे साताऱ्याच्या जागेकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# मुनगंटीवारांच्या अडचणीत वाढ

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय घडामोडीना वेग आला आहे. अशातच सभा, प्रचार यांना सुरुवात झाली आहे. अशातच प्रचारसभे दरम्यान, केलेल्या एका वादग्रस्त वक्तव्यावरून भाजपचे चंद्रपूरचे लोकसभेचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. मोदींच्या प्रचारसभेवेळी बोलताना मुनगंटीवार यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची निवडणूक आयोगाने दखल घेतली आहे.

मुनगंटीवारांच्या वक्तव्याचा व्हिडिओ काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी ट्विटरवर पोस्ट करत, निवडणूक आयोगाला टॅग करून मुनगंटीवार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यांच्या या पोस्टवर उत्तर देत निवडणूक आयोगाने आपल्या तक्रारीची दखल घेण्यात आली आहे असे सांगितले आहे. निवडणूक आयोगाने तात्काळ मुनगंटीवार यांच्या या भाषणाची दखल घेऊन कारवाई केली पाहिजे. अशा तऱ्हेची विखारी भाषा खपवून घेतली जाऊ नये असे सांगण्यात आले.

# राहुल, प्रियंका यांचा 'रोड शो'

## शरद पवार, उद्धव ठाकरेंच्याही सभा



। पुणे । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीकडून प्रचाराचे नियोजन करण्यात आले असून, पुण्यात काँग्रेसचे नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे यांचे 'रोड शो', माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या सहाही विधानसभा मतदारसंघांत सभा आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची सभा घेऊन वातावरण निर्मिती केली जाणार आहे. त्याचा निवडणुकीत फायदा होईल, असा विश्वास काँग्रेसचे उमेदवार आमदार रवींद्र धंगेकर यांनी येथे व्यक्त केला. ही निवडणूक मोदी आणि मोदीविरोधक अशीच आहे. मोदी विरोधकांची मते काँग्रेसला मिळतील, असा दावा धंगेकर यांनी केला.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यामागे मोठा जनाधार कायम राहिला आहे. शिवसेनेची मोठी ताकद शहरात आहे. त्यामुळे मोदींची सभा झाली तरी, काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मतदान होईल. त्यादृष्टीने राहुल गांधी, प्रियंका गांधी यांचे 'रोड शो' आणि शरद पवार यांच्या सहा विधानसभा मतदारसंघांत सभा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असेही धंगेकर म्हणाले. सहाही विधानसभा मतदारसंघातून मताधिक्य प्राप्त होईल.

# संभाजीनगरमध्ये महायुतीत रस्सीखेच सुरू



। छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी।

महायुतीकडून लोकसभेच्या छत्रपती संभाजीनगर मतदार संघातून कुठला पक्ष निवडणूक लढवणार? उमेदवार कोण असेल? यावरून अद्यापही रस्सीखेच सुरूच आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर उमेदवाराची घोषणा होईल, असे कार्यकर्त्यांना अपेक्षित होते. पण, हा मुहूर्त टळला. त्यामुळे या जागेचा तिढा कायम आहे. एकीकडे ही जागा आम्हाला सुटेल असा दावा शिंदे गटाचे पदाधिकारी करत असताना दुसरीकडे भाजप अद्यापही प्रयत्न सोडायला तयार नाही. आजवर युतीत येथून आम्हीच लढलो आहोत. त्यामुळे संभाजीनगरची जागा ही आमची पारंपरिक सीट आहे, असा दावा शिवसेना शिंदे गटाकडून केला जात आहे.

# भाजप २१४ च्या वर जात नाही

## सतेज पाटलांचा हल्लाबोल



। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

देशपातळीवर फोडाफोडीचे पेटंट फक्त भाजपकडे आहे. भाजपने पक्ष फोडण्याचा ट्रेडमार्क घेतला आहे, त्यामुळे तो दुसऱ्या कुणाला लागू होऊ शकत नाही, अशा शब्दात आ. सतेज पाटील यांनी हल्लाबोल केला. कार्यकर्त्यांना मोठं गाजर दाखवावे लागते त्याचा प्रयत्न चंद्रकांतदादा प्रामाणिकपणे करत आहेत. कोल्हापूरमध्ये मोदी, आदित्यनाथ, अमित शाह प्रचाराला आले तरी त्याचा परिणाम पाहायला मिळणार नाही, अशा शब्दात सतेज पाटील यांनी चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या टीकेचा समाचार घेतला.

पाटील यांनी सांगितले की, कोल्हापूरची अस्मिता शाहू महाराजांच्या निमित्ताने दिल्लीला पाठवायची आहे. लोकांच्या मनामध्ये काँग्रेस आणि शाहू महाराज हे फिक्स झाले आहे. कोल्हापूरच्या जनतेने ठरवलं आहे खासदार बदला परिस्थिती बदलेल, खासदार बदला कोल्हापूर बदलेल हाच हट्ट कोल्हापूरकरांनी धरला आहे. आम्ही पण इथलेच आहोत आम्ही पण कोल्हापूरचेच आहोत. काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात पहिल्यांदा प्रत्येक तालुक्यात कार्यालय हा उपक्रम राबवला जात आहे. पाच वर्षात संजय मंडलिक करू शकले नाहीत म्हणून ते आता टीका करत आहेत. याच अजिंक्यताराचा रोल २०१९ साली काय होता? अशी विचारणाही सतेज पाटील यांनी केली.

# भाजपची दहावी यादी जाहीर

। वाई । प्रतिनिधी ।

भाजपची दहावी यादी बुधवारी (१०) जाहीर झाली तरी, खा. उदयनराजे यांना उमेदवारी मिळण्याची प्रतीक्षा कायम राहिल्याने साताऱ्यात उदयनराजेंचे कार्यकर्ते आक्रमक झाले. भाजपकडूनही उदयनराजेंचे नाव चर्चेत नसल्याने कार्यकर्ते नाराज झाले. उमेदवारी जाहीर न करणे हा छत्रपतींच्या गादीचा अपमान आहे असे सांगत खा. उदयनराजेंचे नाराज समर्थक साताऱ्यात आक्रमक झाले आहेत.

# सुशीलकुमार शिंदें प्रचारात सक्रिय



। सोलापूर । प्रतिनिधी ।

माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे वयाच्या ऐंशी वर्षातही तरुणांना लाजवेल असा प्रचार करत फिरत आहेत. लेकीला निवडून आणण्यासाठी शिंदे दिवसरात्र एक करत आहेत. थकलेल्या आवाजात, वृद्ध वयात पायी-पायी चालत मतदारांना आवाहन करत आहेत. लेक प्रणिती शिंदेला दिल्लीत पाठवण्यासाठी थकलेले सुशीलकुमार वणवण भटकत आहेत.

मंगळवारी गुढीपाडवा होता, यानिमित्त सुशीलकुमार शिंदे यांनी भारतीय पारंपरिक पेहराव घालून विविध कार्यक्रमांना हजेरी लावली.

सुशीलकुमार शिंदेनी मंगळवारी सांयकाळी पारंपरिक वेशभूषा धोतर-शर्ट परिधान करून शिवसेना उद्धव ठाकरे आणि काँग्रेस यांच्यासोबत बैठक केली.

वयोमानानुसार, पार थकून गेलेले वृद्ध माजी मुख्यमंत्री भाषण देखील हळू आवाजात करत होते. लेकीसाठी दिवसरात्र एक केलेले सुशीलकुमार शिंदे यांचा घसा देखील बसला होता. शिंदेना धोतर बाबत विचारताच त्यांनी हसत हसत उत्तर दिलं, गुढी पाडवा आहे, म्हणून पारंपरिक वेशभूषा परिधान केली, ही लुंगी नाही तर धोतर आहे आणि धोतरमधून काहीही संदेश देण्याचा प्रयत्न माझा नाही, असंही ते म्हणाले.

# राज यांच्या भूमिकेनंतर सरचिटणीसांनी सोडला पक्ष

## मनसैनिकही संभ्रमात; कार्यकर्त्यांची समजूत कशी काढणार?

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. अशातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा देत असल्याचे मंगळवारी जाहीर केले. त्यांच्या या भूमिकेमुळे सर्वांनाच धक्का बसला. अशातच नेत्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. ठाकरेंच्या महायुतीला मनसेचा बिनशर्त पाठिंबा देण्याचा भूमिकेनंतर मनसेत असणारे कार्यकर्ते आणि काही पदाधिकारी आश्चर्यचकित झालेत. पक्ष पक्षप्रमुखांनी भूमिका स्पष्ट केल्यामुळे उघडउघड कुणी बोलत नसले तरी सर्वत्र नाराजी असल्याचे दिसून येत आहे. त्यातच मनसेचे सरचिटणीस किर्तीकुमार शिंदे यांनी परखड पोस्ट शेअर करत मनसेला जय महाराष्ट्र केला आहे.

२०१९ लोकसभा निवडणुकांच्या धामधुमीत राज ठाकरे यांनी भाजप-मोदी- शाहांविरोधात रणशिंग फुंकले होते तो माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा काळ होता. त्या दिवसांत त्यांनी घेतलेल्या सर्व जाहीर 'लाव रे तो व्हिडिओ' सभांना मी उपस्थित होतो आणि सभांमध्ये ते भाजप-मोदी-शाह यांच्या विरोधात जे तथ्य-विचार मांडत होते त्यांबद्दल सविस्तर लेख लिहून त्यांची भूमिका अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत होतो.

गेल्या १० वर्षांत, त्यातही विशेष करून मागच्या ५ वर्षांत 'भामोशा'ने देशाचे अक्षरशः वाटोळं केले आहे. पारदर्शक कारभाराचा दावा करत सत्तेवर येऊन भामोशा अपारदर्शक हुकूमशाहीने दडपशाही करत आहे.

ईडी, सीबीआय, इन्कमटॅक्स यांच्या चौकशांचा ससेमिरा पाठीमागे लावून भाजपेतर राजकीय पक्षांच्या नेत्यांना आणि त्यांच्या निकटवर्तीयांना गजाआड पाठवण्याची भीती दाखवून वॉशिंग मशीनमध्ये घालून त्यांचे शुद्धीकरण करून त्यांचे भामोशामध्ये सक्तीने पक्षांतर करवून घेतले जात आहे.

मनसे सोडण्याच्या माझ्या या भूमिकेचा- कृतीचा कुठल्यातरी उथळ गोष्टीशी बादरायण संबंध जोडून उठवळ राजकारणाचा धुरळा उडवण्याचा प्रयत्न केला जाणार नाही, ही अपेक्षा असे कीर्तिकुमार शिंदे, मनसे सरचिटणीस यांनी सांगितले.

# पालघरमध्ये बविआ निवडणूक लढवणार



। वसई । प्रतिनिधी ।

बहुजन विकास आघाडीने पालघर लोकसभा मतदारसंघात उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी पक्षाचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी घोषणा केली. येत्या ४-५ दिवसांमध्ये उमेदवाराच्या नावाची घोषणा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. पालघर लोकसभा मतदारसंघ अत्यंत चुरशीचा बनलेल्या आहे. या मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीतर्फे भारती कामडी यांची उमेदवारी जाहीर झाली आहे, तर महायुतीत राजेंद्र गावित यांचे नाव चर्चेत आहे. परंतु, हितेंद्र ठाकूर यांचा बहुजन विकास आघाडी पक्ष निवडणूक लढवणार की नाही याबद्दल गेल्या काही दिवसांपासून साशंकता व्यक्त व्यक्त करण्यात येत होती. दुसरीकडे पक्षाच्या ठिकठिकाणी प्रचारही सुरू होता.

आमच्याकडे सात ते आठ इच्छुक उमेदवार असून सर्वांना विश्वासात घेऊन योग्य उमेदवाराची निवड केली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

विकास कामे हा आमचा प्रचाराचा प्रमुख मुद्दा असणार असल्याचे त्यांनी सांगितले. २००९ मध्ये आम्ही हा मतदारसंघ जिंकला होता. त्यामुळे नैसर्गिकरित्या आमचा या मतदारसंघावर हक्क असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक पक्षांनी माझ्याकडे पाठिंबा मागितला होता, माझे सर्व पक्षांची चांगले संबंध आहेत, त्यांनी माझ्याकडे पाठिंबा मागण्यापेक्षा सर्वांनी मिळूनच मला पाठिंबा द्यावा असाही टोला त्यांनी लगावला.

### प्रतापरावांना उमेदवारी

**बुलढाणा :** उमेदवारी भरण्याच्या शुभारंभाला का होईना, महायुतीतील बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचा तिढा अखेर सुटला ही जागा शिवसेना शिंदे गटालाच मिळाली आहे. येथून खासदार प्रतापराव जाधव हे सलग चौथ्यांदा निवडणूक लढविणार आहे. महायुतीतर्फे जाधव हे उमेदवार असून शिंदेगटाच्या पाहिल्याच यादीत त्यांचे नाव आहे. मागील ३ लढतीत सलग विजय मिळविणारे जाधव चौथ्यांदा मैदानात उतरणार आहे. २००९, २०१४, २०१९ च्या निवडणुक लढवली होती.

निवडक

## स्वामींचा प्रकट दिन साजरा

**मुरूड :** मुरुड डोंगरी येथील त्रिशा पाटील यांच्या खाजगी मठात स्वामीसमर्थ प्रकट दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळी ५ वाजल्यापासून नामस्मरणाला सुरूवात झाली. त्रिशाताईंच्या मार्गदर्शनाखाली विश्वशांतीसाठी होम हवन संपन्न झाला. होम सुरु असताना स्वामीसमर्थ जप १ हजारवेळा भक्तांनी घोषात जपला. दुपारी महाआरती नंतर महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तांनी घेतला. सायंकाळी ५ वाजता स्वामींची पालखी मंदिरातून निघाली. मुंबईतील ढोल पथकांनी सुरूवात झाली.

## रस्त्यासाठी परवानगी

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील मोग्रज पंचायतमधील दुर्गम भागात असलेल्या कळकराई गावासाठी आता रस्ता होणार आहे. मोग्रज ते कळकराई हा साधारण पावणे पाच किलोमीटर लांबीचा रस्ता बनविण्यास वन विभागाने परवानगी दिली आहे. या भागातील ग्रामस्थ दररोज डोंगर उतरून कर्जत तालुक्यातील माणगाव या ठिकाणी येऊन कर्जत शहरात येत असतात. ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत यांच्या पाठपुराव्यामुळे रस्त्याचे काम मंजूर झाले आहे. तसेच, रस्त्याच्या कामासाठी शासनाने तब्बल साडेसात कोटींचा निधी मंजूर करून दिला आहे.

## पाणपोईची मागणी

**तळा :** तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून वाढत्या उष्णतेमुळे अंगाची लाही लाही होत आहे. अशावेळी घशाला कोरड पडत असल्यामुळे नागरिक आपसूकच पाणी पिण्यासाठी पाण्याकडे धाव घेतात. मात्र, तळा शहरातील बाजारपेठ परिसरात पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी २० रुपये मोजावे लागत आहेत. सध्या प्रचंड उष्णता असल्याने तहान लागली तर पाणपोईची व्यवस्था नसल्याने या नागरिकांची मोठी समस्या निर्माण होते.

## मोबाईल युनिट सूरु

**उरण :** पीएम-जनमन अंतर्गत दुर्गम व अतिदुर्गम भागांमध्ये मोबाईल मेडीकल युनिटची सुरुवात पंचायत समिती उरण येथे समीर वठारकर, डॉ.बाबासो काळेल यांच्या हस्ते करण्यात आली. मोबाईल मेडिकल युनिट अंतर्गत वैद्यकीय चमुद्वारे आदिवासी गावातील सर्व नागरिकांची तपासणी तसेच त्यांना शासनांच्या आरोग्यविषयक योजनांची माहिती देणे व मदत करणेबाबत नियोजित असल्यामुळे तालुक्यातील अदिवासी लोकांना घरपोहोच आरोग्यसेवा मिळणार आहेत.

## म्हसळ्यात पोलीस संचलन

**म्हसळा :** एकाच महिन्यात साजरी होणारी मुस्लिम बांधवांची रमजान ईद व हिंदू धर्मातील सण, उत्सव गुण्यागोविंदाने, आनंदी आणि शांततापूर्ण वातातवरणात साजरे व्हावेत. कुठेही कायदा सुव्यवस्था निर्माण होऊ नये यासाठी आधीच खबरदारीचा उपाय म्हणून म्हसळा शहरात पोलिसांनी रूटमार्च काढून दक्षता घेतली आहे. ईदच्या पूर्वसंध्येला म्हसळा पोलिसांनी काढलेल्या रूटमार्चमध्ये डीवायएसपी डॉ.विवेक वसंतराव मुगरीकर, सपोनि पवन चौधरी, सपोनि बांडे यांच्यासह ४५ पोलीस कर्मचारी, चार होमगार्ड सहभागी झाले होते.

# सीएनजीच्या २५० बसेस धावणार

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**वाढत्या डिझेलच्या महागाईला रोखण्यासाठी एसटी महामंडळाने पर्यायी मार्ग म्हणून सीएनजीवर चालणाऱ्या एसटी बसेस घेण्याचा निर्णय घेतला आहे. रायगड विभागात चार ठिकाणी सीएनजी पंप उभारणीचे काम सुरु असून रामवाडी येथील काम पुर्ण झाले आहे. या ठिकाणी सध्या सीएनजीवर चालणाऱ्या ६४ बसेसचा समावेश असून लवकरच २५० बसेस धावणार असल्याची माहिती एसटी महामंडळ रायगड विभागाकडून देण्यात आली आहे.**

एसटी महामंडळ रायगड विभागात अलिबाग, पेण, कर्जत, महाड, माणगाव, श्रीवर्धन, मुरूड व रोहा असे आठ एसटी बस आगार असून १९ बस स्थानके आहेत. जिल्ह्यात ४८० एसटी बसेस आहेत. त्यात शिवशाही, निमआराम व साध्या बसेसचा समावेश आहे. जिल्ह्यातील एका आगारातून दिवसाला सुमारे पाच हजार लिटरची आवश्यकता निर्माण होते. या डिझेलमागे पाच लाखहून अधिक खर्च होतो. त्यामुळे आठ आगारातून दिवसाला डिझेलमागे सुमारे ४० लाख रुपये खर्च येत असल्याचे समोर आले आहे.

### ६४ एसटी बसेस रस्त्यावर लागल्या धावू



एसटी उत्पन्न वाढविण्याबरोबरच प्रवासी संख्या वाढविण्यासाठी एसटी महामंडळ वेगवेगळ्या योजना राबवित आहे. तरीदेखील एसटी तोट्यात आहे. एसटीतील तोटा भरून काढण्यासाठी एसटी महामंडळाने सीएनजीवर धावणाऱ्या गाड्या उपलब्ध करण्यास सुरुवात केली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, रामवाडी, कर्जत व महाड या ठिकाणी महानगरचे गॅस पंप उभारले जाणार आहेत. पंप उभारणाची काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये रामवाडी येथील सीएनजी पंपाचे काम पुर्ण झाले असून सीएनजीवर चालणाऱ्या ५२ बसेस उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तसेच कर्जतमध्ये १२ बसेसचा समावेश आहे. २३ फेब्रुवारीपासून रामवाडी येथील सीएनजी पंप सुरू झाला तेव्हापासून सीएनजीवर चालणाऱ्या बसेस ठाणे, मुंबईसह अन्य ठिकाणी धावू लागली आहेत. जिल्ह्यात सीएनजी चालणाऱ्या २५० एसटी बसेस असणार आहेत. ठाणे-भांडूप येथून या गाड्या तयार केल्या असून लवकरच त्या रस्त्यावर धावणार असल्याची माहिती एसटी महामंडळ रायगड विभागाने दिली.



## लोकसभा निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

**। म्हसळा । वार्ताहर ।**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत येत्या ७ मे रोजी होणाऱ्या मतदाननिमित्त श्रीवर्धन मतदार केंद्रस्तरीय अधिकारी आणि कर्मचारी यांचे पहिले प्रशिक्षण माणगाव येथे सोमवारी (दि.८) संपन्न झाले. तसेच, ईव्हीएम व्हीव्हीपॅट यंत्र हाताळणे बाबत प्रशिक्षण अशोक दादा साबळे विद्यालयामध्ये संपन्न झाले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ज्योत्स्ना पडियार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या प्रशिक्षणासाठी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीवर्धन महेश पाटील, श्रीवर्धन तहसीलदार महेंद्र वाकलेकर, म्हसळा तहसीलदार समीर घारे, माणगाव तहसीलदार विकास गारुडकर, तळा तहसीलदार स्वाती पाटील आदी अधिकारी उपस्थित होते.

सर्व कर्मचारी यांना आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण माणगाव तहसीलदार विकास गारुडकर यांनी दिले. निवडणुकीच्या काळात प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांची महत्वाची भूमिका असते असे म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी सांगून प्रत्येक कर्मचाऱ्याने भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

## हेदवलीत रंगला हरिनामाचा गजर

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील ऐनघर पंचक्रोशीतर्फे हेदवली येथील अखंड हरिनाम सप्ताह सोहळा दि. ६ ते ९ एप्रिल या चार दिवसांत पार पडला. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ९ एप्रिल रोजी सकाळी नारायणदादा वाजे यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर हेदवली गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

टाळ- मृदुंगाच्या तसेच ज्ञानोबा माऊलींच्या गजरात गावातील सर्व महिला मंडळ, तरुण-तरुणी मोठ्या उत्साहाने या हरिनामाच्या गजरात रंगुन गेले होते. हा अखंड हरिनाम सप्ताह पंचक्रोशीचा असल्यामुळे दर तीन वर्षांनी एकदा हा सोहळा प्रत्येक गावांमध्ये येत असल्यामुळे हा सोहळा उत्साहात साजरा करण्यात येतो.



## मुरूडमध्ये सार्वजनिक वाचनालयात चैत्रसंध्या

**। कोर्लई । वार्ताहर ।**


मुरुड जंजिरा रायगड वाचनालय मुरुडतर्फे गुढीपाडव्याच्या दिवशी चैत्र-संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुण्या दिपाली दिवेकर, दिपाली जोशी, संजयज गुंजाळ, अरूण बागडे, उषा खोत, नैनिता कर्णिक, विनय मथुरे, उत्कर्षा गुंजाळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन सरस्वती पूजन व ग्रंथपूजन करण्यात आले. दिपाली जोशी यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाची रूपरेषा, गुढीपाडव्याचे महत्त्व, वसंतोत्सव महत्व विशद केले. रिध्दी भगत हिने आपल्या कवितांद्वारे चैत्र पाडव्याचे गुढी उभारण्याचे महत्त्व सांगितले. नैनिता कर्णिक यांनी भाई दिवेकर यांची गुढीपाडवा संकल्प कविता वाचून दाखवली. उषा खोत यांनी चैत्र महिन्यातील झाडांविषयी महत्व कवितेद्वारे विशद केले.

## संदीप देसाई यांना पत्नी शोक

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुका कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह तथा राष्ट्रीय कबड्डी पंच संदीप देसाई यांच्या पत्नी श्वेता देसाई यांचे



नुकतेच निधन झाले. त्या ४७ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, आई, भाऊ असा परिवार आहे. रासळ येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. श्वेता देसाई यांच्या अकस्मात मृत्यूमुळे देसाई-खाडे कुटुंबियांसह रासळ गावावर शोककळा पसरली आहे. त्यांचे उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१२) राहते घरी रासळ येथे होणार आहेत.




## संगीत मैफलीने जिंकली कर्जतकरांची मने

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

द स्वरबरसात इव्हेंट प्रस्तुत 'ये शाम मस्तानी' या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. या मैफलीत गायकांनी सादर केलेल्या मराठी, हिंदी नवीन जुन्या गीतांनी कर्जतकरांची मने जिंकली.

या मैफलीत सूर निरागस, माय भवानी, शंभो शंकरा, विठ्ठल आवडी, शारद सुंदर, मन उधाण वाऱ्याचे, गोमू संगतीन, अजीब दासता हैं आदी अशी गीते गायक अभिषेक नलावडे, मंदार भिडे, सई जोशी, प्रीती जोशी यांनी सादर केली. त्यांना तबल्यावर यश हजारे, ढोलकीवर प्रसाद पाठारे, ऑक्टोपॅडवर प्रवीण भोपी, सिंथेसायझर वर अभिषेक जहागीरदार आणि नरेंद्र सकटे यांनी साथ संगत दिली. निवेदन समीर खरे यांनी केले.

याप्रसंगी भाई गायकर, मनोहर थोरवे, संभाजी जगताप, पंकज पाटील, अभिषेक सुर्वे, संकेत भासे, प्रसाद थोरवे, उत्तम शेळके, शिवराम बदे, रोहित विचारे, तात्या रुठे आदींसह मोठ्या संख्येने संगीत प्रेमी उपस्थित होते.

## मुक्ताबाई मोकल यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील वारकरी संप्रदायाच्या मुक्ताबाई शंकर मोकल (९०) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर वारकरी संप्रदायाच्या तसेच विविध क्षेत्रातील मंडळींच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात



दोन मुले आणि सहा मुली, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.१६) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होणार आहे. तर, उत्तरकार्य विधी गुरुवारी (दि.१८) चिरनेर येथील राहत्या घरी दुपारी बारा वाजता होणार असल्याची माहिती मुलगा दत्तात्रेय मोकल व काशिनाथ मोकल यांनी दिली.

## रस्त्यावरच कचरा टाकण्याचा प्रताप

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन नगर परिषदेची घंटागाडी श्रीवर्धन बाजारपेठेतून सकाळी व संध्याकाळी अशी दोन वेळा कचरा उचलण्यासाठी फिरत असते. प्रत्येक दुकानदार आपला कचरा कचराकुंडीमध्ये भरून एका बाजूला ठेवत असतो. घंटागाडीवरील कर्मचारी कचराकुंडी उचलून कचरा घंटागाडीमध्ये टाकून घेत असतात. नगरपरिषेकडून नागरिकांसाठी कचरा उचलण्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध असताना देखील काही व्यापारी आपला कचरा प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरून रस्त्यावरती ठेवत आहे. तसेच, श्रीवर्धन बाजारपेठेमध्ये काही नागरिक व व्यापारी कचरा गटारामध्ये फेकण्याचा प्रकार देखील करत असतात. बाजार पेठेतील दादर पुलाजवळ असणाऱ्या एका इमारतीसमोर रोज रात्री गटारामध्ये कचरा टाकण्यात येतो. नगर परिषदेचे कर्मचारी रोज सकाळी हा कचरा उपसून नेत असतात. परंतु, दुसऱ्या दिवशी पुन्हा ते गटार कचऱ्याने भरले जाते. तसेच, श्रीवर्धन शहरातील काही नागरिक सुद्धा आपल्या घरी कचराकुंडी न ठेवता कचरा गटारात फेकतात. या प्रकरणी गंभीरपणे दखल घ्यावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास ३०० नग सोल-लेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५
- फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१
- भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरूड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५
- अलिबागमध्ये ब्राह्मण आळीत राम मंदिराजवळ पहिल्या मजल्यावर, स्वतंत्र जिना असलेले दोन वाणिज्य गाळे (कार्पेट ५५० चौ. फुट व १५०० चौ. फुट) विकणे/भाड्याने देणे आहेत. (डॉक्टर्स/वकील/पतपेढी वगैरेसाठी उपयुक्त) संपर्क : ७२७६५९१३०२/९७६२३२५०७२
- अलिबागपासून सुमारे दहा किलोमीटरवर वढाव (खुर्द) येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन बोअरवेल, मीटर व घरपरवानगीसहित विकणे आहे. संपर्क : ७२७६५९१३०२/९७६२३२५०७२
- अलिबाग शहरापासून ५ कि.मी. पर्यंत ६ गुंठे जमीन पाहिजे. ७०६६१३८३६८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# आईचा जीव कासावीस

### हरविलेल्या मुलाच्या शोधासाठी पोलिसांचे प्रयत्न

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातून ऑक्टोबर २०२३ मध्ये हरवलेल्या मुलांबाबत सहा महिन्यानंतर देखील कर्जत पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्या मुलाच्या आईची स्थिती आपला मुलगा हरवून सहा महिने झाल्यानंतर शोध लागत नसल्याने कुठे कुठे शोधू अशी झाली आहे.

२४ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ९ वाजता कर्जत शहरातील ओम धर्मोदय अपार्टमेंटमध्ये राहणारा श्रेयस यशवंत देशमुख (२२) हा मुलगा मानसिक तणावामुळे घरातून निघुन जात असल्याची चिठ्ठी टेबलावर ठेवून घरातून निघून गेला तो आजपर्यंत घरी परतलेलाच नाही. मुलगा घरातुन निघून गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्याची आई सुजाता देशमुख यांनी कर्जत पोलीस स्टेशनमध्ये मुलगा हरविल्याची तक्रार नोंदवली आहे. या केसचा तपास त्यावेळी सहाय्यक फौजदार संजय जगताप हे करीत होते. परंतु, महिना झाला तरी मुलाचा शोध लागत नसल्याने वैफल्यग्रस्त असलेल्या सुजाता देशमुख या जगताप यांना त्याबाबत विचारणा करत होते. मुलाकडे असलेल्या मोबाईलचे सिडिआर लोकेशन पुर्णपणे बंद आल्यामुळे मुलाला शोधण्यात अपयश येत असल्याचे सांगण्यात येत आहे.


मुलाच्या आईने दिलेल्या माहितीनुसार, ज्या-ज्या ठिकाणी मुलाला पाहिले गेले त्या-त्या ठिकाणी आम्ही शोध घेतला आहे. तसेच, इतरही अनेक ठिकाणी शोध घेऊन मुलगा ज्या-ज्या ठिकाणी येण्याची शक्यता आहे त्या-त्या ठिकाणी त्याचे स्केच व माहिती दिलेली आहे. मुलाला शोधण्यासाठी पोलीस सर्वोतोपरी प्रयत्न करत असुन मुलाचे हरविल्याचे पोस्टरही बनवण्यात आले आहे. परंतु, काही दिवसांपुर्वीच मुलाला स्वार्मीच्या मठात पाहिले असल्यामुळे पोस्टर लावणे थांबवले आहे. कारण, पोस्टर पाहून जवळपास असलेला मुलगा दुर कुठे जायला नको. तसेच, कर्जत पोलीस लवकरच मुलाला शोधून काढतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## पेणमध्ये आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील हमरापूर येथे शिवप्रेमी सेवा संघ व युसूफ मेहरअली तारा रुग्णालय यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराला ओमकार पाटील, प्रदीप म्हात्रे, अक्षय दाभाडे, कृष्णा गोळीमडे, सचिन गोळीमडे, सचिन शेलार, विनोद नाईक, संदेश कदम, सुरेश एनपुरे यांच्यासह ग्रामस्थ व सदस्य उपस्थित होते. गेल्या २५ वर्षानंतर नवीन नाईक यांच्या प्रयत्नामुळे हे शिबीर घेण्यात आले. यावेळी नेत्र तपासणी, ब्लड प्रेशर, ई.सी.जी व इतर तपासणी करून औषधे देण्यात आली. शिबिरात डॉ. विशाखा ठाकूर, जरीना शेख, वेदश्री म्हात्रे, नवीन नाईक, भाऊ प्रतिभा मोकल, मालती म्हात्रे, सुश्रुषा हॉस्पिटल टीम व हॉस्पिटल स्टाफने ग्रामस्थांची तपासणी केली.

## लहानग्यांचे रोजे गोड



**। म्हसळा/माणगाव । प्रतिनिधी ।**

मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिन्याचे उपवास (रोजे) संपत असून ११ एप्रिल रोजी रमजान ईद (ईद-उल-फित्र) संपन्न होत आहे. मुस्लिम समाजातील शिकवणीनुसार आणि मुस्लिम धर्माच्या परंपरेप्रमाणे प्रत्येक मुलाने आणि मुलीने लहानपणीच संपूर्ण महिनाभर उपवास करायचे असतात.

यावेळी म्हसळा कुंभार आळीतील इब्राहिम नविद वस्ता (७), जुने माणगाव येथील बुशरा इम्रान धवलारकर (८), सॉलीहा आदिल गजगे (९), तळा मेठ मोहल्ला येथील जैद नसीर रहाटविलकर (९) व अब्दुलकरीम बरकतअली रहाटविलकर (९) यांनी अत्यंत कोवळ्या वयात पवित्र रमजानचे सर्व रोजे यशस्वीपणे पूर्ण केल्याने त्यांचे म्हसळा, माणगाव व तळा तालुक्यातून विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.

इस्लाम धर्मात ईमान, नमाज, रोजा, जकात, हज ही पाच मूलभूत तत्वे मानली जातात. त्यापैकी रमजान महिन्यातील रोजा हा एक आहे. इस्लामी शाबान महिन्यानंतर रमजान महिना सुरु होतो. यावर्षी १२ मार्चपासून रमजान रोजे सुरु झाले होते. हे रोजे अत्यंत कडक असतात. मुस्लिम बांधव रमजान महिन्यात दरवर्षी हे रोजे महिनाभर धरीत असतात.

# फार्महाऊससाठी वळविला रस्ता

### खांडपोली ग्रामस्थ आक्रमक; आंदोलनाचा इशारा

**। पाली । प्रतिनिधी ।**

**पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत भैरव आवंढे खांडपोली ते काम थेकरवाडी अशी रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. भेरव आवंढे खांडपोली हा आधीपासूनच रायगड जिल्हा परिषदेचा डांबरी रस्ता असून त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर कुठेही डांबर राहिले नसून माती व दगड शिल्लक राहिले आहेत. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत हा रस्ता नव्याने बांधण्यात येत आहे.**



खांडपोली हे पूर्वीपासून महसुली गाव आहे. गावामध्ये जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा, पंचायतीचे व वनविभागाचे कार्यालय आहे. परंतु, काही ठराविक अधिकाऱ्यांना हाताशी धरून कामथेकर वाडीच्या रस्त्याला लागून असलेल्या दहा पंधरा फार्महाऊस मालकांनी त्यांच्या सोयीसाठी हा रस्ता आवंढे फाट्यावरून तोडून कामथेकर वाडीकडे वळविला असून याच्या विरोधात ग्रामस्थ खांडपोली गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

रायगड जिल्हा परिषदेचा मूळ रस्ता भैरव आवंढे खांडपोली हा जवळपास साडेपाच किलोमीटर अंतराचा रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून मंजूर झाला आहे. दिल्लीवरूनही या रस्त्याला मंजुरी मिळून त्यासाठी निधीची तरतूद सुद्धा करण्यात आली. भैरव आवंढे खांडपोली हा नियमात बसणारा रस्ता असतानाही कामथेकर वाडीच्या फाट्यावर खांडपोलीकडे जाणाऱ्या रस्त्याला कट करून काही ठराविक फार्म हाऊसच्या मालकांसाठी तो थेट कामथेकर वाडीकडे वळविण्यात आला असल्याने खांडपोलीकडे जाणारा जवळपास दीड पावणेदोन किलोमीटरच्या रस्त्याला कोणत्या नियमानुसार कट करण्यात आला, असा सवाल खांडपोली ग्रामस्थ करीत आहेत. खांडपोली ग्रामस्थांचे एक शिष्ट मंडळ महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्था पुणे या योजनेचे मुख्य अभियंता माने यांची भेट घेऊन खांडपोली गावाची फसवणूक करून चुकीच्या मार्गाने केवळ फार्म हाऊस मालकांच्या सोयीसाठी हा रस्ता कामथेकर वाडीकडे वळविला जात आहे, हे निदर्शनास आणून दिले.

वास्तविकता भैरव आवंढे खांडपोली असा सरळ असताना त्याचे तुकडे कोणी केले? रस्त्याचा सर्वे होत असताना खांडपोली ग्रामस्थांपैकी पंचनाम्यासाठी एकाही नागरिकाला का घेतले नाही? खांडपोलीकडे जाणारा रस्ता अत्यंत दैनावस्थेत असताना सुद्धा तो रस्ता मध्येच का कापला, असा सवाल खांडपोली ग्रामस्थ करीत आहेत. खांडपोली या महसूल गावालाच बगल दिल्याने केवळ फार्म हाऊस मालकांच्या सोयीसाठी हा रस्ता बनविला जात असेल आणि खांडपोली गावाकडे हा जर रस्ता होत नसेल तर खांडपोलीचे ग्रामस्थ आंदोलन करतील, असा इशारा स्थानिक ग्रामस्थ अनिल वाणी, संतोष डाके, वैभव खानेकर, विजय वाघमारे, यांनी दिला आहे.

# माथेरान जंगलात बिबट्याचा वावर

## वनविभागाने नागरिकांना केले सतर्क

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान जंगल आणि आजूबाजूच्या जंगलात उन्हाळ्यात पाण्याच्या शोधात जंगलातील प्राणी मनुष्यवस्तीकडे झुकताना दिसत आहे. मागील दोन दिवसात माथेरानमधील गार्बेटवाडीकडे जाणारा बेकरा पॉईंट परिसरात बिबट्यामुळे माथेरान वनविभागाने हिंस्त्र प्राण्यांपासून वाचण्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे, तसेच बिबट्याचा वावर असल्याने नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक



ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटिंग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे उसरोली, ता. मुरूड, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक गौरीबाई कमळ्या मुरूडकर, मंजुळाबाई महादेव पुगावकर यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विदयमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उसरोली, ता. मुरूड, जि. रायगड**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ४४२ | ०-४७-० | ०.३२ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :-१०/०४/२०२४

**ॲड. दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे. रेवोली ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) कमला प्रकाश जैन २) नैना जितेंद्र जैन, राहणार मु. रेवोली, ता. रोहा, जि. रायगड यांजकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विदयमान मालकांच्या दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विदयमान मालकांनी दिलेला असून सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबतचे शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीची विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातर जमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु पैसे) |
|---|---|---|---|
| रेवोली, ता. रोहा, | १७४ | ०-३९-२० पो.ख. ०-०६-८० एकुण ०-४६-०० | ९.३७ |
| | १९० | ०-३८-२० पो.ख. ०-०४-८० एकुण ०-४३-०० | ६.१९ |
| | १८६ | ०-५२-६० पो.ख. ०-०८-६० एकुण ० ६१-२० | १०.१९ |
| | १७३/अ | ०-२१-०० पो.ख. ०-११-८० एकुण ०-३२-०० | १.६० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचेही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साडेकरार, वहीवाटीचे जाणेयेणेचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पुढील १५ (पंधरा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग,
कळावे,
दिनांक- ०८/०४/२०२४.

सही/-
**ॲड. सीमा किशोर घरत,**
जिल्हा न्यायालय, रायगड.
अलिबाग कार्यालय पत्ता-
गंगाधर को. ऑप. हौस.सोसा. चेंढरे-अलिबाग.
मो.नं. ९८९०७३२४९७

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री अश्विन अभय अघमकर, रा. पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ यांनी मौजे. काकळघर, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीचे विदयमान मालक श्री. प्रदिप पांडुरंग भालेकर यांचेकडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भोगवटा धारक | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे काकळघर, ता. मुरूड, | श्री. प्रदिप पांडुरंग भालेकर | १६८ | ०-३४-०० पो.ख.०-०२-०० एकूण ०-३६-०० | ४.९५ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी ०-२०-९० हे. आर. इतके क्षेत्र कायम खरेदी विक्री करण्याबाबतचा सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विदयमान मालक श्री. प्रदिप पांडुरंग भालेकर यांच्या हिश्याची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विदयमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्च, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून दयाव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विदयमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विदयमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक १०/०४/२०२४

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड. मो.नं. ९२७२६२०००५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली जमीन सौ. प्रमिला अरूण मालुसरे, श्री. माधुरी दत्तात्रय मालुसरे, सौ. शकुंतला उर्फ आशा बाळकृष्ण मालुसरे व सौ. शशिकला उर्फ शुभांगी सुर्यकांत चव्हाण यांचे मालकीहक्क व ताबे वहिवाटीची असून, त्यांनी सदरील जमीन आमचे अशिलांस विक्री करणेचे मान्य व कबूल केलेले आहे.

सदरील जमीन पुर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असल्याचा भरवसा व खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि, सदरील जमीनीवर अन्य कोणाचाही विक्री, हस्तांतरण, गहाण, भाडेपट्टा, तारण, दान, मृत्यूपत्र, अदलाबदल, ताबा, विरोधी कब्जा, वारसाहक्क, पोटगी वा तत्सम स्वरूपाचा बोजा वगैरे असल्यांस, संबंधितांनी प्रस्तूत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह आमचे खालील पत्त्यावर हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यांस, सदरील जमीनीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, अधिकार वा हितसंबंध वगैरे नाही. असल्यास, तो त्यांनी सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**'परिशिष्ट'**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका कर्जत, मे. दुय्यम निबंधक, कर्जत यांचे कार्यकक्षेतील, ग्रामपंचायत मुलकी गांव मौजे वैजनाथ येथील जमीन मिळकत, सर्व्हे नंबर ८४/२, यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ३८.७० आर (०० हे. ११.६० आर पोटखराब्यासहित), यांसी आकार रक्कम रूपये ०३.३१, तसेच सदर जमीनीशी जोडलेल्या सर्व हक्क, अधिकार व हितसंबंधासह.

पुणे,
दि. १०/०४/२०२४

सही/-
**चंद्रकांत नाणेकर,**
ॲडव्होकेट.
बी - १०१, ओम रेसीडेन्सी, माऊली गार्डन मंगल कार्यालयासमोर, सर्व्हे नंबर २६५/८, बाणेर,
पुणे- ४११०४५ (०२०) २७२९२४२५, ९५७९६६७७५२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे मालक श्री.शौकिन वसंत राणे रा. मु.पो.नागाव, ता.अलिबाग,यांच्याकडुन माझे अशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड | २२४ | ०-२५-६० ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-२७-६० | ६.५६ |

वर नमूद जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, वहिवाटीचा हक्क, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दहा दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन इतर कोणाचाही कायदेशिर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशिर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १०/०४/२०२४

सही/-
**ॲड. वैभव वसंत पाटील**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, फोन नं. ९८५०२६१००८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे धामोते, ता, कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे मालक मंजूर अब्दुल रज्जाक लगड यांची सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३७ | ४ क | ०-११-४० | १-०६ |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक ११/०४/२०२४

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ कृपा हौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ,
नेरळ ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड न. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे आगरकोट, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आगरकोट ता. अलिबाग | ३२/२ | बागायत ०-४०-०० | २४.८० |

वर वर्णन जमीन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक रवि कपूर, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिथे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकविस) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक - १०/०४/२०२४
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची शेतजमिन मिळकत, श्री. जयवंत दत्तात्रेय नार्वेकर व सौ. सुनिता जयवंत नार्वेकर, दोघेही राहणार दहीसर (प.), मुंबई यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ००-२१-३० (हे.आ.), शेतजमिन मिळकत रस्त्याच्या वहिवाटीच्या हक्कासहीत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी, ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र ( हे. आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| कावीर, ता. अलिबाग. | २१९ | ० | ०-५८-८० **०-०५-१० पो.ख.** ०-६३-९० एकूण | १२-३७ |

सदर मिळकतीपैकी ०-२१-३० (हे.आर.) ही जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १०/०४/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक उमेश अनंत नाईक, उर्मिला उमेश नाईक, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नगर भूमापन क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| बेलकडे ता. अलिबाग, | ५९ | १३३.६७ | अ |

वर वर्णन जमिन मिळकत तसेच त्यावर असणारी ग्रामपंचायत बेलकडे मालमत्ता क्र. १४८ ब आणि २२० या घर मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग

दि. १०/०४/२०२४
मोबा. ९८२२०१७१६१

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
मु. बामणोली, पो. थळ ता. अलिबाग, जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे **धामोते,** ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे मालक **१) श्री. केतन विलास कोठारी व २) श्री. धरमचंद मांगीलाल जैन** यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा. नं | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२८ | १९ | २००-०० | २०-०० |
| १२८ | २० | २७१-०० | २७-१० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. ११/०४/२०२४.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग को.ऑ.हौ.
सो.ब्राम्हण आळी, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो.९८५०४०२६५७.

### जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. नाना कृष्णा पाटील रा. मु. चिंचवली, पो. नारंगी, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

मौजे नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे आमचे अशिल व श्री.रमाकांत कृष्णा पाटील यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नारंगी,ता. अलिबाग, जि. रायगड. | ४९/१अ | ०-३५-५० पो.ख. ०-०७-६० एकूण ०-४३-१० | ९.९४ |

सदरहू मिळकतीसंदर्भात श्री. नाना कृष्णा पाटील व इतर यांनी श्री.रमाकांत कृष्णा पाटील यांच्या विरुध्द अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं.४९/२००० ने वाटपाकरीता व इतर मागण्यांकरीता दावा दाखल केला होता. सदरहू दाव्याचा निकाल दि.२०/१२/२०१० रोजी होवून श्री. नाना कृष्णा पाटील यांस मिळकतीतील अर्धा हिस्सा जाहीर करुन सरस-निरस वाटपासंबंधी आदेश केले. त्यानंतर श्री.रमाकांत कृष्णा पाटील यांनी रेग्युलर मुकदमा नं. ४९/२००० मधील दि.२०/१२/२०१० रोजीच्या आदेशाविरुध्द जिल्हा न्यायाधिश रायगड, अलिबाग यांच्या कोर्टात अपिल क्र.३३/२०११ ने अपिल दाखल केले होते. त्या अपिलामध्ये दि.२५/०७/२०१८ रोजी आदेश होवून अपिल हे फेटाळण्यात आले. त्यानंतर श्री. रमाकांत कृष्णा पाटील यांनी मुंबई येथील उच्च न्यायालयात दुसरे सिव्हील अपिल स्टॅम्प क्र. ३२४७१/२०१८ ने अपिल दाखल केले आहे. सदरहू अपिल हे प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.नाना कृष्णा पाटील यांनी रेग्युलर मुकदमा नं.४९/२०००मधील दि.२०/१२/२०१० रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने श्री. रमाकांत कृष्णा पाटील यांच्या विरुध्द रेग्युलर दरखास्त नं. २९/२०१८ ने दरखास्त दाखल केलेली असून सदरहू दरखास्त प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे

असे असताना श्री. रमाकांत कृष्णा पाटील हे मौजे नारंगी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ४९/१अ, एकूण क्षेत्र ०-४३-१० हे.आर. या मिळकतीपैकी काही क्षेत्राची मिळकत त्रयस्थ इसमांस विकत आहेत असे आमच्या अशिलांस खात्रीलायक समजले.

आमच्या अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे असे असताना श्री.रमाकांत कृष्णा पाटील हे मौजे नारंगी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं.४९/१अ, एकूण क्षेत्र ०-४३-१० हे. आर. या मिळकतींसंबंधी अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर दरखास्त नं.२९/२०१८ ने दरखास्त प्रलंबित असताना कुणीही कोणत्याही प्रकाराचा खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. सदरहू व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०४/०४/२०२४.

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला, हिराबाग को.ऑप. हौ. सोसायटी, सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड. मोबा. नं. ९८६७७१५५२४

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १. | रोडपाली ८९ | आंबेतखार ३८ | ४३७/१८९ | ०-१३-३ | ५५० चौ.मी. | भुखंड क्र.५३, सेक्टर-१६E, क्षेत्र - ५४९.५२ चौ.मी. | कै.गणपत काना पगडे यांचे वारस १.भालचंद्र गणपत पगडे | निरंक |
| | | रोडपाली २०३ | ३८६/२ | ०-२९-८ | | | | |
| | | रोडपाली ३९ | ३९१/० | ०-२२-३ | | | | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-६५-४ | | | | |
| २. | दापोली २९ | दापोली १९९ | १८/४ १८/६ २४/१ ३५/३ ८२/६ | ०-२०-८ ०-१०-० ०-९-० ०-३१-२ ०-२०-० | ८०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. E-७, सेक्टर-८, क्षेत्र-७९९.९९ चौ.मी. | १) श्री. गजानन बाबू कुडावकर २) श्रीमती मैनाबाई बाबू कुडावकर ३) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर ४) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील ५) श्रीमती द्रोपदी विश्वनाथ गायकवाड ६) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील ७) श्रीमती नर्मदा रामचंद्र दमडे ८) श्रीमती जनाबाई धर्मा पाटील | रे.मु.क्र. १२०/२०१४ या दाव्यामधील निशाणी क्र.१३५ वरील दि.१६.१२.२०२३ रोजी तडजोडपुरशीस नुसार १) श्री. गजानन बाबू कुडावकर, २) श्रीमती मैनाबाई बाबू कुडावकर, ३) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर, ४) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील, ५) श्रीमती द्रोपदी विश्वनाथ गायकवाड, ६) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील, ७) श्रीमती नर्मदा रामचंद्र दमडे व ८) श्रीमती जनाबाई धर्मा पाटील यांच्या नावे उलवे नोड येथील इरादित भूखंड क्र. E-७, सेक्टर-८, क्षेत्र-७९९.९९ चौ.मी. या भुखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | | | एकूण | ०-९१-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
(पनवेल)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/००७/२०२४-२५

निवडक

## आमिर टी-२० संघात

**लाहोर :** फिक्सिंग प्रकरणामुळे दोषी आढळल्यानंतर बंदी घातलेला पाकिस्तानचा खेळाडू मोहम्मद आमिर पाकिस्तानच्या राष्ट्रीय संघात परतला आहे. १८ एप्रिलपासून पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. पाकिस्तान या मालिकेचे आयोजन करत आहे. त्याचवेळी पीसीबीने या टी-२० मालिकेसाठी संघाची घोषणा केली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय मागे घेतलेले वेगवान गोलंदाज आमिर याचे पाकिस्तान संघात पुनरागमन झाले आहे.

## पृथ्वीविरोधात तक्रार

**मुंबई :** विनयभंगाच्या आरोपाप्रकरणी तक्रार करूनही क्रिकेटपटू पृथ्वी शॉ याच्यासह अन्य आरोपींविरोधात मुंबई पोलिसांनी गुन्हा नोंदवलेला नाही. त्यामुळे, मुंबईच्या पोलीस आयुक्तांसह सात पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी समाजमाध्यम प्रभावक महिलेने उच्च न्यायालयात याचिकेद्वारे केली आहे. सेल्फी काढण्यावरून झालेल्या वादानंतर अंधेरी येथील एका पबमध्ये शॉ आणि अन्य आरोपींनी आपला विनयभंग केल्याचा महिलेचा आरोप आहे.

## हल्ल्यात फुटबॉलपटूची हत्या

**चेन्नई :** जगप्रसिद्ध फुटबॉलपटू, ऑलिंपिकवीर ल्यूक फ्लूर्स याची हत्या करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार दरोडेखोरांसोबत झालेल्या झटापटीत दरोडेखोरांनी त्याची गोळ्या घालून हत्या केल्याचे समजते. ल्यूक हा हनीड्यू परिसरात पेट्रोल पंपावर रांगेत उभा असताना त्याच्यावर गोळीबार करण्यात आला. फ्लूर्स टोकयो ऑलिम्पिकमध्ये दक्षिण आफ्रिका संघाचा सदस्य होता. पोलीस कारची लूट आणि हत्याप्रकरणी तपास करत आहेत असे पोलिसांनी सांगितले.

## हार्दिक कृष्णाच्या चरणी!

**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्या सध्या ईश्वर भक्तीत तल्लीन झाल्याचे दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वीच त्याने सोमनाथ मंदिरात जाऊन महादेवाची पूजा केली होती आणि तो कृष्ण भक्तीत लीन झाल्याचे दिसले आहे.या व्हिडिओमध्ये दिसते की हार्दिक आणि कृणाल हे माईकवर हरे कृष्णा, हरे रामा अभंग गात आहेत. यावेळी त्यांचे कुटुंबिय देखील तिथे उपस्थित असून सर्वांनी पारंपारिक वेशभूषा केली आहे. हा व्हिडओ एका पूजेतील असावा, असा कयास आहे.

## नबीच्या लेकाचा षटकार

**मुंबई :** नबी आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सचा भाग आहे. तो मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर त्याच्या मुलाबरोबर सहज क्रिकेट खेळत असातानाचा एक व्हिडिओ मुंबई इंडियन्सने सोशल मीडियावर शेअर केला आहे.या व्हिडिओमध्ये दिसते की नबी गोलंदाजी करत आहे, तर त्याचा मुलगा फलंदाजी करत आहे. यावेळी नबीने टाकलेल्या एका चेंडूवर त्याच्या मुलाने अफलातून हेलिकॉप्टर शॉट खेळला. त्याने ज्या कौशल्याने हा हेलिकॉप्टर शॉट खेळला, त्याचे कौतुक होत आहे.

## आग्राव येथील शिडवाल्या होड्यांची शर्यत

# कोर्लईची कमलावती होडी प्रथम



**। रेवदंडा । वार्ताहर ।**

कुंडलिका समुद्रखाडीत सालाबाद प्रमाणे दर्यासागर मित्रमंडळ पूर्वापाडा, आग्राव आयोजीत शिडवाल्या होड्यांच्या शर्यतीत कोर्लईच्या संजय पाटील यांची कमलावती शिडवाली होडी प्रथम, आग्रावची हरिश्चंद्र शेट्टी यांची हिरकणी शिडवाली होडी व्दितीय, तर आग्रावमधील हरिश्चंद्र जानपाटील यांची जयवंती शिडवाली होडी तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. तर रेवदंडा येथील महेश पाटील व दिनेश मेस्त्री यांची वसुंधरा होंडी, आग्रावमधील अभिजीत अधिकारी व जयेंद वरसोलकर यांची लक्ष्मी शिडवाली होडी, तसेच आग्रावमधील राजेंद्र अधिकारी यांची पद्मावती शिडवाली होडी यांची उत्तेजनार्थ म्हणून निवड करण्यात आली.

गुढीपाडव्याचा दुसऱ्या दिवशी नवसाचे नारळ आई एकविरा मातेला देण्याची पूर्वापार प्रथा आग्रावकरांनी जोपासली आहे. त्यानिमित्ताने १० एप्रिल रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास कुंडलिका खाडीत शिडवाल्या होड्यांच्या जंगी शर्यती दर्यासागर मित्रमंडळ पूर्वापाडा आग्राव आयोजीत करते. या स्पर्धेच्या निमित्ताने आग्रावसह, साळाव, कोर्लई, रेवदंडा व थेरोंडा विभागातील यांत्रिक होड्यासुध्दा कुंडलिका समुद्रखाडीत पै-पाहुणे, कुटुंबियासह येत असतात. विविधतेने नटवलेल्या होड्यांमध्ये बेजोंपथक, नाचगाणे यांनी कोळीबांधवाची हौस शिंगेला पोहचलेली असते. एकंदरीत होड्यांचा जत्रौत्सव कुंडलिका समुद्रखाडीत पहावयास मिळतो.

यावर्षी शिडवाल्या होड्यांच्या शर्यतीस आयोजकांच्या वतीने प्रथम क्रमांकास ७० हजार रूपये रोख व भव्य चषक, व्दितीय क्रमांकास ५० हजार रूपये रोख व भव्य चषक, तृतीय क्रमांकास ३० हजार रूपये रोख व भव्य चषक, तसेच बक्षिस पात्र नसलेल्या होड्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे ठेवण्यात आली होती. या स्पर्धेचे आयोजक दर्यासागर मित्रमंडळ आग्राव अध्यक्ष गोरख विश्वनाथ डोयले, उपाध्यक्ष दिपक जानू पाटील, सचिव जयवंत हरिश्ंचद्र बागवाले, खजिनदार राजेंद्र नारायण डोयल तसेच पंचकमिटी विजय बाळाराम चोगले, संजय काशिनाथ डबे, रामदास बाळाराम चोगले, प्रभाकर चांगू लोदीखान, निकेश कमळाकर नाखवा, नथुराम अष्टमकर, चंद्रकांत किसन पाटील, रविंद्र रामभाउ चोगले, महेंद्र विठ्ठल सरदार यांनी विशेष परिश्रम घेतले. तर स्पर्धे साठी प्रवेश फी फक्त एक हजार रूपये जयंवत बागवाले व दिपक बलकवडे यांनी स्वीकारली.

स्पर्धेत जानतीवर होडी कै. कमळाकर नारायण नाखवा यांची ठेवण्यात आली होती. या स्पर्धे च्या शुभारंभ प्रसंगी शेकापक्षाचे संदिप घरत, अलिबाग तन्मेश ज्वेलर्सचे उमेश मोरे, अमर पाटील, राजेश खर्डे-वेसावकर आणि ओएनजीसी कंपनीचे पंकज शेट्टी, सुरेश खोत आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## कुस्ती महासंघाच्या निलंबनासंदर्भात भूमिका स्पष्ट करा!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय कुस्ती महासंघाने क्रीडा मंत्रालयाने आपल्यावर लादलेल्या निलंबनाला आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना मंगळवारी दिल्ली उच्च न्यायालाने क्रीडा मंत्रालयाला आपली भूमिका स्पष्ट करण्याची सूचना केली.

संयुक्त जागतिक कुस्ती संघटनेकडून उठविण्यात आलेली बंदी, भारतीय ऑलिम्पिक समितीकडून बरखास्त करण्यात आलेली हंगामी समिती या पार्श्वभूमीवर क्रीडा मंत्रालयाने अद्याप डब्ल्यूएफआयवरील निलंबनाची कारवाई मागे घेतलेली नाही. यासंदर्भात डब्ल्यूएफआयने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील पुढील सुनावणी २८ मे रोजी होणार आहे.

## खेळात टिकण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक



### हॉकीपटू धनंजय महाडिक यांचे प्रतिपादन

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

खेळात टिकायचे असेल तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू धनंजय महाडिक यांनी ओम् कबड्डी प्रबोधिनीच्या २१व्या वर्धापनदिनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना केले.

आज सर्वच खेळ गतिमान झाले असून मातीतील खेळ मॅटवर खेळले जाऊ लागले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस खेळाच्या कौशल्यात बदल होत आहेत. त्यात टिकून रहायचे असेल व प्रगती करावयाची असेल, तर नवनवीन तंत्रज्ञान अवगत करून ते आत्मसात करावयास हवे, असे पुढे धनंजय महाडिक म्हणाले. यंदा नवयुग क्रीडा मंडळ व बँक ऑफ महाराष्ट्राची अंजली वैशंपायन यांना महिलांत, वडेश्वर सेवा मंडळ व सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या चंद्रकांत परब यांना पुरुषांत हा पुरस्कार देऊन महाडिक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



## श्री देव रवळनाथ क्रिकेट स्पर्धा
## गांगेश्वर क्रिकेट संघास जेतेपद

**। मालवण। वृत्तसंस्था ।** श्री देव रवळनाथ क्रिकेट संघ वायंगणी मुंबई, या मंडळाने ग्रामस्थांना एका प्रवाहात आणण्यासाठी क्रिकेट सामन्यांचे आयोजन श्रमिक जिमखाना मैदान येथे करण्यात आले होते. त्यात ३०० हुन अधिक तरुण खेळाडूंनी सहभाग घेतला.

बाबू राणे, हरिश्चंद्र सावंत, समेंद्र सावंत व मंगेश सावंत यांनी या स्पर्धा यशस्वी करण्याकरीता परिश्रम घेतले.या स्पर्धेचा अंतिम सामना गांगेश्वर क्रिकेट संघ विरुद्ध पावणाई क्रिकेट संघ या संघांमध्ये झाला.यामध्ये गांगेश्वर क्रिकेट संघ अंतिम विजयी ठरला. पावणाई क्रिकेट संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.अंतिम सामन्यातील सामनावीर चेतन सावंत, सर्वोत्कृष्ट गोलंदाज प्रदीप सावंत, सर्वोत्कृष्ट फलंदाज आतिश सावंत, मालिकावीर ऋषिकेश सावंत यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## भारतातील फुटबॉल टॅलेंट हंटला सुरुवात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अंडर १४ वयोगटातील प्रतिभावान फुटबॉलपटूना शोधून काढण्याची आतापर्यंतची सर्वात मोठी मोहीम सुरु झाली आहे. इंडियन टायगर आणि इंडियन टायग्रेसेस असं या मोहिमेच नाव आहे. तज्ज्ञांच्या मदतीने जागतिक स्तरावर भारताची फुटबॉलमध्ये एक वेगळी ओळख निर्माण करणं, हा या मोहिमेमागचा उद्देश आहे.

अंगी फुटबॉल खेळण्याच कौशल्य असलेल्या मुला-मुलींना शोधून त्यांना योग्य प्रशिक्षण देणं, संधी देणं आणि व्यावसायिक फुटबॉलपटू बनण्यासाठी मार्ग उपलब्ध करुन देण हा या मोहिमेमागे उद्देश आहे. एका भव्य-दिव्य कार्यक्रमात आज या मोहिमेचा शुभारंभ झाला.

या टॅलेंट हंटमध्ये जर्मनीचे दिग्गज फुटबॉलपटू सुद्धा सहभागी होणार आहेत. बरुण दास यांनी या उपक्रमामागची संकल्पना समजावून सांगितली. या मोहिमेमुळे भारतीय फुटबॉलला एक नवी दिशा मिळेल. भारतात फुटबॉल खेळणाऱ्यांसाठी ही मोठी संधी आहे. युवा फुटबॉलपटूना जागतिक स्तरावर ओळख मिळेल. छोट्या वयातच करिअरमध्ये त्यांना एक मोठी झेप घेता येईल. या उपक्रमामुळे खेळाडूंसाठी नवे दरवाजे उघडतील. त्यांची हजारो स्वप्न साकार होतील असं बरुण दास म्हणाले.

टॅलेंट हंटचा हा कार्यक्रम एप्रिल ते जुलै पर्यंत चालणार आहे. या खास इवेंटमध्ये जर्मनीतील दिग्गज फुटबॉलपटू सहभागी होणार आहेत.जर्मन फुटबॉल असोसिएशनमध्ये आंतरराष्ट्रीय मीडिया प्रमुख काय डॅमहॉल्ज, बुंडसलीगामधून पीटर लायबल, रीस्पोचे सीईओ गेरहार्ड रीडल, आशिया आणि युरोपमध्ये महिला फुटबॉलला नव्या उंचीवर घेऊन जाणारी जूलिया फार, जर्मनी आंतरराष्ट्रीय फुटबॉल संस्थेचे डॉ आंसेम कूच्ला, स्ट्रायकरलॅब्सचे सीईओ फिलिप क्लॉकल आणि वेलेंटीना पुत्ज सुद्धा या आयोजनात सहभागी होणार आहेत.जुलै आणि ऑगस्टमध्ये एक कठीण निवड प्रक्रिया होईल. २० खेळाडू आणि २० स्टँडबायची यामध्ये निवड करण्यात येणार आहे.

## राबगाव कबड्डी स्पर्धेत आपटवणे विजयी



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

श्री वरदायिनी राबगाव यांच्या वतीने सुधागड तालुका आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने तालुकास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत संघाने आपला प्रवेश नोंदविला होता.या स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.या स्पर्धेतील अंतिम लढत आपटवणे विरुद्ध रासळ या संघात झाली .या लढतीत ॐ काळभैरव आपटवणे हा प्रथम क्रमांकाच मानकरी ठरला. या संघास रोख रक्कम १५ हजार व चषक तर द्वितीय क्रमांक जय हनुमान रासळ या संघास रोख रक्कम १० हजार व चषक देण्यात आले. या स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचा मानकरी भैरीनाथ वावे तर चतुर्थ क्रमांकाचा मानकरी काळभैरव भार्जे या दोन्ही संघास प्रत्येकी ७ हजार व चषक देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट खेळाडू समाधान मोरे, उत्कृष्ट चढाई वैभव खाडे, उत्कृष्ट पक्कड निलेश सकपाळ, पब्लिक हिरो सोहंम साळुंखे यांना सन्मानित केले.




# मूर्ती लहान, पण कीर्ती महान!

## ९ वर्षांच्या अर्शियाने उचलले ७५ किलो वजन



**। पुणे । वृत्तसंस्था ।**

भारताची ९ वर्षांची अर्शिया गोस्वामी हिने ७५ किलो वजन उचलत अनेकांचे लक्ष वेधले आहे. तिचा वेटलिफ्टिंगचा व्हिडिओही व्हायरल होत आहे.नुकताच तिचा एक व्हिडिओ चर्चेत आला आहे. यामध्ये ती तब्बल ७५ किलो डेडलिफ्ट करताना दिसत आहे. या व्हिडिओला २२ लाखांहून अधिक लाईक्स आले आहेत. ४८ मिलियनहून अधिक व्ह्युज आले आहेत.

अर्शिया ही हरियाणातील पंचकुला येथील असून ती गेल्या काही वर्षांपासून वेटलिफ्टिंग करत आहे.

तिने २०२१ साली जेव्हा वयाच्या ६ व्या वर्षीय ४५ किलो वजन उचलले होते.त्यावेळी ती सर्वात युवा डेडलिफ्टर ठरली होती. तिने २०२३ मध्ये ६० किलो वजन उचलत पुढचे पाऊल टाकले होते. तिने तिच्या एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये असेही सांगितले होते की भारताची ऑलिम्पिक पदकविजेती मिराबाई चानू ही तिची आदर्श असून तिचीही ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची इच्छा आहे.

## नागपूरच्या समीक्षा, अनंतने जिंकले राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

अलिकडेच हरयाणा येथील रोहतकमध्ये खेलो इंडिया स्पर्धेच्या अंतर्गत राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करत कनिष्ठ गटात नागपूरच्या समीक्षा सिंगने सुवर्णपदक पटकावले. स्पर्धेत नागपूरच्या पाच मुष्ठीपटूंनी विविध वजनी गटात पदक जिंकले.

अनंत देशमुख याने सुवर्ण जिंकले. दुसरीकडे, स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पराभवाचा सामना करावा लागल्यामुळे नागपूरच्या मल्हार साबळे याला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. धैर्य कोठी, श्रद्धा खोब्रागडे यांनी देखील उत्तम कामगिरी करत कांस्य पदकाची कमाई केली. पदकप्राप्त सर्व खेळाडू प्रशिक्षक पुरोहित यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहेत.







# मालिकेतील आव्हान कायम राखण्यासाठी लढणार

**। पर्थ । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिंपिकच्या दृष्टीने महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांत भारतीय पुरुष हॉकी संघाला सपाटून मार खावा लागला. आता दोन देशांमधील तिसरा सामना होणार असून सलग तिसरा पराभव टाळण्यासाठी भारतीय संघ प्रयत्न करणार असून त्यामुळे मालिकेतील आव्हानही कायम राहणार आहे.

यजमान ऑस्ट्रेलियन संघ विजयी मालिका कायम ठेवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करताना दिसेल. यजमान ऑस्ट्रेलियन संघाने पहिल्या लढतीत भारतीय संघाचा ५-१ असा धुव्वा उडवला. त्यानंतर दुसऱ्या लढतीत भारतीय संघाचे आव्हान ४-२ असे संपुष्टात आणले.

## भारत- ऑस्ट्रेलियामध्ये आज तिसरी हॉकी लढत



मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन याप्रसंगी म्हणाले की, ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका भारतीय संघाच्या कामगिरीत सुधारणा आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

कर्णधार हरमनप्रीत सिंग स्वत: बचावफळीत खेळत असून पहिल्या दोन्ही लढतींत भारतीय संघ या विभागात ढिसाळ कामगिरी करताना दिसत आहे. ऑस्ट्रेलियन हॉकीपटूंना पेनल्टी कॉर्नरवर तसेच फिल्डमध्ये सहज गोल करता येत आहेत.

एवढेच नव्हे तर भारतीय हॉकीपटूंना आक्रमक फळीतही अपयशाला सामोरे जावे लागत आहे. मनदीप सिंग, अभिषेक, ललितकुमार उपाध्याय, गुर्जंत सिंग व सुखजीत यांना मिळालेल्या संधीचा फायदा घेता यायला हवा. पहिल्या दोन लढतींत त्यांना संधीचे गोलमध्ये रूपांतर करता आलेले नाही. भारतीय हॉकीपटूंनी मधल्या फळीत समाधानकारक कामगिरी केलेली आहे.

## विविध योजनांचा अवलंब

भारतीय हॉकी संघाचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन या मालिकेत विविध योजनांचा अवलंब करताना दिसत आहे. काही नवे प्रयोगही त्यांच्याकडून करण्यात येत आहे. हॉकीपटूंनी छोट्या पासेसवर लक्ष द्यावे, असे त्यांना वाटत आहे. पेनल्टी कॉर्नर स्पेशालिस्ट खेळाडूंनी थेट स्ट्राईक करीत गोल करावा, यासाठी ते आग्रही आहेत. भारतीय संघाकडून पहिल्या दोन लढतींत प्रयोग करण्यात आले खरे; पण त्यांना ऑस्ट्रेलियाचा बचाव अद्याप भेदता आलेला नाही.भारत- ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये उद्या तिसरी लढत होणार असून त्यानंतर १२ एप्रिल रोजी चौथा सामना खेळवण्यात येणार आहे. तसेच दोन देशांमधील पाचवा सामना १३ एप्रिल रोजी पार पडणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)